वचनाच्या इंधनाने आत्मा प्रज्ज्वलित करून ख्रिस्ताला उंचावणारी उपासना

लेखक: स्टीव्ह फर्नांडिस

अनुवाद: क्रॉसी उर्टेकर

वचनाच्या इंधनाने आत्मा प्रज्ज्वलित करून ख्रिस्ताला उंचावणारी उपासना

© २०१७ लव्ह महाराष्ट्र
सर्व हक्क स्वाधीन

पहिली मराठी आवृत्ती: २०१७

लेखक: स्टीव्ह फर्नांडिस
अनुवाद: क्रॉसी उर्तेकर

प्रकाशक: लव्ह महाराष्ट्र

लव्ह महाराष्ट्र
१७७२ भीमपुरा गल्ली क्र. २३
बाबाजान चौक,
पुणे - ४११००१
महाराष्ट्र
दुरध्वनी: ०२०-२६३४०५५३
ईमेल: lovemaharashtra@gmail.com
वेबसाईट: lovemaharashtra.org

विषयसूची

	पृष्ठ
ख्रिस्ताच्या दृष्टिकोनातून उपासना: भाग पहिला (योहान ४:२०-२४)	४
ख्रिस्ताच्या दृष्टिकोनातून उपासना: भाग दुसरा (योहान ४:२०-२४)	९
उपासना व भावना: (योहान ४:२०-२४)	१३
देवाचे वचन, स्तुतीची गीते गाणे, आणि ख्रिस्ताचे गौरव (कलसै ३:१६,१७)	२२
आत्म्याने देवाची उपासना (फिलीपै ३:१-३)	३३

ख्रिस्ताच्या दृष्टिकोनातून उपासना, भाग १ - योहान ४:२०-२४

प्रस्तावना

अ. उपासनेवरील नव्या करारातील हा प्राथमिक शास्त्रभाग आहे.

ब. विधिसंस्कार, स्थळ, इमारतीची बांधणी, वाद्ये किंवा संगीताची शैली यापैकी कशाचाही संदर्भ या शास्त्रभागात आढळत नाही.

क. ख्रिस्त बाह्यस्वरूपाच्याही खोल असलेल्या उपासनेच्या खरेपणाकडे जातो. याखेरीज कोणत्याही स्वरूपाची उपासना निरर्थक ठरते. तो उपासनेच्या मर्मावर व सत्यतेवर प्रकाश पाडतो.

I. आराधनेविषयी तीव्र मतभेद असलेल्या प्रसंगी ख्रिस्ताने उपासनेविषयी ही शिकवण दिली. ती स्त्री त्याला म्हणाली, "महाराज आपण संदेष्टे आहा हे आता मला समजले. आमच्या पूर्वजांनी ह्याच डोंगरावर उपासना केली आणि तुम्ही म्हणता जेथे उपासना केली पाहिजे ते नाव यरुशलेमात आहे" (४:१९,२०).

अ. उपासनेचा संदर्भ आल्याचा परिणाम असा झाला की त्या स्त्रीने येशू निदान संदेष्टा असल्याचे तरी ओळखले. ती स्त्री म्हणाली, "आपण संदेष्टे आहा हे आता मला समजले" (४:१९).

आपला बोलण्याचा विषय तिने बदलल्यावरून कदाचित येशूने १६-१८ वचनात सुरू केलेल्या तिच्या पापी जीवनावरील चर्चा ती टाळू पाहात असेल.

ब. जुन्या कराराच्या काळापासून यहूदी व शोमरोनी यांची उपासनेच्या स्थळाविषयी भिन्न मतप्रणाली होती हे तिला ठाऊक होते (अनुवाद १२:५).

१. जे शोमरोनी फक्त नियमशास्त्राची पाच पुस्तके मानत होते, ते ज्या शखेमातून आशीर्वाद जाहीर करण्यात आले होते ते शखेमच उपासनेचे स्थान समजत होते (अनुवाद ११:२९, ३०).

जो देश ताब्यात घ्यायला तू जात आहेस तेथे तुझा देव परमेश्वर तुला नेऊन पोहंचवील तेव्हा तू गरिज्जिम डोंगरावरून आशीर्वाद व एबाल डोंगरावरुन शाप उच्चारावा. हे डोंगर यार्देनेपलीकडील सूर्य मावळतो त्या दिशेला अर्थाबाबत पाहाणारे कनानी ह्यांच्या प्रदेशात गिल्गालासमोर, मोरे येथील एलोन वृक्षाच्याजवळ आहेत ना (अनुवाद ११:२९,३०)?

२. शोमरोनी लोकांनी अनुवाद १२:५ "निवडले आहे" असे चूक वाचले तर यहूद्यांनी "निवडून घेईल" असे वाचून, यरुशलेमातील मंदिराची जागा असा त्या स्थानाचा अर्थ घेतला.

पण तुमचा देव परमेश्वर आपल्या नावाची स्थापना करण्यासाठी तुमच्या सर्व वंशांच्या वचनातून जे स्थान निवडून घेईल तेथे त्याच्या निवासस्थानी तुम्ही त्याला शरण जा व तेथेच जात जा (अनुवाद १२:५).

II. ख्रिस्ताच्या म्हणण्यानुसार उपासनेतील बदल हा होता की खऱ्या उपासनेला स्थळाची गरज नसते. येशू तिला म्हणाला, "बाई, तुम्ही पित्याची उपासना ह्या डोंगरावर व यरुशलेमातील करणार नाही अशी वेळ येत आहे हे माझे खरे मान. तुम्हाला ठाऊक नाही अशाची उपासना तुम्ही करता; आम्हाला ठाऊक आहे अशाची उपासना आम्ही करतो; कारण यहूद्यांतूनच तारण आहे" (४:२१,२२).

अ. ही दोन्ही स्थळे लुप्त पावणार असल्याने तो शोमरोनी व यहूदी यांच्यामधील वाद शिथिल करतो. येशू तिला म्हणाला, "बाई, तुम्ही पित्याची उपासना ह्या डोंगरावर व यरुशलेमातही करणार नाही अशी वेळ येत आहे, हे माझे खरे मान" (४:२१).

ब. तो अप्रत्यक्षपणे असे विधान करतो की इस्राएलांची उपासना खरी आहे. "तुम्हांला ठाऊक नाही अशाची उपासना तुम्ही करता, आम्हांला ठाऊक आहे अशाची उपासना आम्ही करतो; कारण यहूद्यांतूनच तारण आहे" (४:२२).

ख्रिस्त येथे म्हणतो की इस्राएलांना देवापासून कशी व कोठे उपासना करावी याचे प्रकटीकरण झाले आहे. ते लोक शोमरोन्यांसारखे नाहीत कारण कशी उपासना करावी हे ते जाणतात.

क. खऱ्या उपासनेचे प्रमाण हे आहे की प्रकटीकरणाने जे देवाचे व सत्याचे ज्ञान प्राप्त होते त्याला दिलेला हा प्रतिसाद असतो. "कारण यहूद्यांतूनच तारण आहे. तरी खरे उपासक आत्म्याने व खरेपणाने पित्याची उपासना करती अशी वेळ येत आहे, किंबहुना आलीच आहे. कारण आपले उपासक असे असावे अशीच पित्याची इच्छा आहे" (२२ब-२३अ).

१. ही उपासना प्रकटीकरणावर आधारित किंवा सत्य केंद्रित असते.

खरी उपासना कोणती हे देवाकडून होणाऱ्या सत्याच्या प्रकटीकरणावरून ठरते (१ योहान ५:१९-२०). मानव स्वत:हून देवाविषयीच्या असलेल्या त्याच्या स्वत:च्या कल्पनांनी उपासना भ्रष्ट करतो. देवाने वचनात स्वत:विषयी जे प्रकटीकरण दिले आहे व तो कशी उपासना करावी याविषयी जे सांगतो त्यातून खऱ्या उपासनेचा प्रतिसाद येतो व ती केली जाते.

आपल्याला ठाऊक आहे की देवाचा पुत्र आला आहे, आणि जो सत्य आहे त्याला ओळखण्याची बुद्धी त्याने आपल्याला दिली आहे. जो सत्य आहे त्याच्या ठायी म्हणजे त्याचा पुत्र येशू ख्रिस्त ह्याच्या ठायी आपण आहो. हाच खरा देव आणि सार्वकालिक जीवन आहे. मुलांनो तुम्ही स्वत:स मूर्तींपासून राखा" (१ योहान ५:२०,२१).

२. **ती मुक्तिकेंद्रित आराधना असते.**

तारण सिद्धीस नेत असता देवाने आपले जे गुणविशेष प्रदर्शित केले त्या सत्याच्या ज्ञानाला प्रतिसाद म्हणून आपण आराधना केली पाहिजे. ख्रिस्ताने म्हटले, "आम्हांला ठाऊक आहे अशाची आम्ही उपासना करतो कारण यहूद्यांतूनच तारण आहे." यावरून हेच स्पष्टपणे सूचित होते की देवाचे प्रकटीकरण, देवाने ख्रिस्तामध्ये सिद्धीस नेलेल्या तारणाच्या कार्याभोवती केंद्रित आहे, आणि तेच खऱ्या उपासनेचे केंद्रस्थान आहे.

३. **ती मुक्तिदाता केंद्रित किंवा ख्रिस्तकेंद्रित उपासना असते.**

ज्या सत्याने आपण पित्याची उपासना करतो ती ख्रिस्त ज्याला "वेळ" म्हणतो त्याभोवती केंद्रित आहे. आपल्या मरणाने ख्रिस्त देवाचे गौरव करणार या संदर्भात हे म्हटले आहे. खऱ्या उपासनेचा हा कळसाचा केंद्रबिंदू आहे. जी ही वेळ येणार त्या संदर्भात येशू योहान १२:२३,२७,२८ मध्ये बोलतो. त्यात पुढे येऊ घातलेले त्याचे मरण व पवित्र आत्म्याचे आगमन यावर लक्ष केंद्रित केले आहे. देवाने ख्रिस्ताद्वारे जे काही केले त्याभोवती खरी उपासना केंद्रित आहे. कलसैमध्ये पौल त्याला "सुवार्तेचे सत्यवचन" असे संबोधतो. *"स्वर्गात तुम्हांसाठी राखून ठेवलेल्या आशेमुळे ... ह्या आशेविषयी तुम्ही सुवार्तेच्या सत्यवचनात पूर्वी ऐकले"* (कलसै १:५). फिलिपै ३:३ मध्ये पौल म्हणतो, ही उपासना ख्रिस्ताने आपल्याला कृपेने व दयेने नीतिमान ठरवण्याच्या कार्यावर आधारलेली आहे. *कारण आम्ही जे देवाच्या आत्म्याने आराधना करणारे व ख्रिस्त येशूत आनंद करणारे व देहावर भरवसा न ठेवणारे, आम्ही खरे सुंतेचे आहो* (फिलिपै ३:३ पं. र. भाषांतर).

III. **शुभवर्तमानात प्रकट केलेल्या देवाच्या गौरवी सत्याला स्तुतीने वंदन करीत प्रतिसाद देणारे अंत: करण हा खऱ्या उपासनेचा आत्मा व गाभा आहे. "आपले उपासक असे असावेत अशीच पित्याची इच्छा आहे. देव आत्मा आहे आणि त्याच्या उपासकांनी त्याची उपासना आत्म्याने व खरेपणाने केली पाहिजे" (२३ब-२४).**

अ. **सर्व लोकांमधून पिता खऱ्या उपासकांचा पाठपुरावा करून शोध घेत आहे. "आपले उपासक असे असावेत अशीच पित्याची इच्छा आहे" (२३ब).**

ब. देवाचा आत्मा किंवा देवाचा निराकार स्वभाव हा उपासनेचे मूलतत्त्व ठरवतो. आपण आत्म्याने उपासना केली पाहिजे. "देव आत्मा आहे आणि त्याच्या उपासकांनी त्याची उपासना आत्म्याने केली पाहिजे" (२४).

१. देव व्यक्ती आहे आणि त्याचे मूलतत्त्व आत्म्याने भरलेले आहे.

देव आत्मा किंवा निराकार आहे. खरी उपासना आतील मानवातून किंवा निराकारतेतून व्हायला हवी. स्थान किंवा बाह्यात्कारी गोष्टींना उपासनेत महत्व नसते. येशू स्थानाचे, संस्थांचे आणि भौतिक गोष्टींचे महत्व पूर्णत: उपासनेतून काढून टाकतो. या शास्त्रभागात आत्म्याचा वापर मानवाचा अमूर्त भाग म्हणून केला आहे. उदा. १ करिंथ ७:३४ मध्ये "शरीराने व आत्म्यानेही पवित्र व्हावे" असे म्हटले आहे. ख्रिस्त खऱ्या उपासनेच्या निराकार मूलभूत तत्वासंबंधी बोलत आहे. स्थळ किंवा बाह्यविधी, संस्कार खरी उपासना निश्चित करत नाहीत.जो मानवाचा आत्मा किंवा अमूर्त भाग आहे, विशेषकरून अंत:करण तेच खरी उपासना निश्चित करते.

२. केवळ बाह्य स्वरूपाने नव्हे तर अंत:करणाने देवाची उपासना होते (मत्तय १५:८,९).

परुशांची कानउघडणी करताना केवळ स्थळाला महत्व देऊन रिकाम्या विधिसंस्कारांनी केलेली उपासना खरी नाही असे सांगून येशूने तिचा धिक्कार केला. त्याऐवजी त्याने अंत:करणावर भर दिला. तो म्हणाला, *हे लोक ओठांनी माझा सन्मान करतात, परंतु त्यांचे अंत:करण माझ्यापासून दूर आहे. ते व्यर्थ माझी उपासना करतात, कारण ते शास्त्र म्हणून जे शिकवतात ते असतात मनुष्याचे नियम* (मत्तय १५:८,९). येथे आत्म्याने उपासना करण्याविषयीच्या योहान ४ मधील त्याच्या विधानाची पुनरावृत्ती विस्तृतपणे केली आहे.

क. देवाचे स्वत:चे व्यक्त होणे किंवा प्रकटीकरण या आधारावर अंत:करणाचा प्रतिसाद असतो. आपण खरेपणाने उपासना केली पाहिजे. "उपासकांनी ... उपासना ... खरेपणाने केली पाहिजे" (२४).

१. ख्रिस्ताच्या तारणाच्या कार्याद्वारे देवाने केलेले हे प्रकटीकरण आहे.

२. जी वेळ येत आहे तिच्यामध्ये प्रथमत: देवाने जे सिद्धिस नेले त्याचे हे प्रकटीकरण आहे (योहान १२:२०,२६).

ड. खऱ्या आराधकांकडून पिता जी अपेक्षा करतो त्यात बोलणी करायला वाव नाही. त्यांनी केवळ याच प्रकारे उपासना केली पाहिजे.

१. तारणाच्या वेळीच व्यक्ती खरी आराधक बनते. त्यापूर्वी ती खरी आराधक नसते हे ख्रिस्त गृहीतच धरतो (१थेस्सलनी १:९).

२. मंडळीचा व मिशनकार्याचा उद्देश खरे आराधक तयार करणे हा आहे.

देवाच्या कार्याचे धाडसाचे कृत्य, मंडळीची भूतलावरील प्रमुख जबाबदारी ही आहे की सर्व प्रकारच्या लोकगटांतील पाप्यांना पाचारण करायचे असे की ते ख्रिस्तापुढे आपले गुडघा टेकून त्याचे आराधक बनतील. ही गोष्ट प्रकटीकरण ५:९-१४ मध्ये स्पष्ट केली आहे.

ख्रिस्ताच्या दृष्टिकोनातून उपासना, भाग २ - योहान ४:२०-२४

प्रस्तावना

I. **जुन्या उपासनेचे स्थान लोप पावणार असल्याने व ते परिणामकारक नसल्याने खऱ्या उपासनेसाठी ख्रिस्ताने ते बाजूला सारले. येशूने तिला म्हटले, "बाई तुम्ही पित्याची उपासना ह्या डोंगरावर व यरुशलेमातही करणार नाही अशी वेळ येत आहे, हे माझे खरे मान" (२१).**

अ. **खुद्द उपासनेचे स्थान स्वत:मध्ये खऱ्या उपासनेची हमी देऊ शकत नाही.**
आत्मा व खरेपणाची पोकळी असल्यास उपासनेचे स्थान खऱ्या उपासनेला हातभार लावू शकत नाही.

ब. **नव्या करारात उपासनेसाठी वापरलेला प्राथमिक शब्द स्थानावर भर देत नाही.**

१. **शुभवर्तमानात (योहान ४ प्रमाणे) उपासनेसाठी वापरलेल्या (proskuneo) ह्या शब्दाचा भर शरीराची ढब (पवित्रा) व शरीराने उपस्थित राहाणे यावर आहे.**

क. ख्रिस्तासमोर आलेला कुष्ठरोगी (मत्तय ८:२).

ख. त्यांनी जवळ जाऊन त्याचे चरण धरून नमन केले (मत्तय २८:९).

ग. वडीलमंडळाने पाया पडून नमन केले (प्रकटीकरण ५:१४).

२. **स्वर्गारोहणानंतर उपासनेसाठी जोर देऊन वापरलेला शब्द (latreuo) शरीराची ढब किंवा स्थानावर जोर देत नाही तर तर संपूर्ण जीवनाने केलेल्या उपासनेच्या सेवेवर भर देतो.**

अ. पौल दोन प्रसंगी जाहीर करतो की उपासनेचा हा गाभा आहे (प्रे. कृ. २४:१४; २७:२३).

ब. पौल जाहीर करतो की त्याचे जीवनच शुभवर्तमानाद्वारे आत्म्याने उपासना करण्याची सेवा आहे (रोम. १:९; फिलिपै ३:३).

क. ख्रिस्ताच्या बदलीच्या मरणाने जे शुद्ध झाले आहेत तेच त्यांच्या सेवेमध्ये उपासना करतात (इब्री ९:१४; १०:२).

ड. जे स्वर्गात आहेत ते सतत सेवेद्वारे उपासना करतात (प्रकटीकरण२२:३).

इ. आत्म्याने उपासना करण्याच्या सेवेसाठी आपली जीवने समर्पित केलेली आहेत.
(रोम. १२:१,२).

फ. स्तुती व आभारप्रदर्शन ही उपासनेची सेवा आहे (इब्री १३:१५). (हे वचन वेगळ्या संदर्भात असले तरी संबंधित आहे.

ग. दान देणे ही देखील उपासनेची कृती आहे. (फिलिपै ४:१८). (हे देखील वेगळे वचन आहे.)

क. बोलाचालीस मुभा न देता खऱ्या उपासनेचे दोन घटक येशू नेमून देऊन त्यासंबंधी आज्ञाही देतो. त्या म्हणजे देव आत्मा आहे आणि त्याच्या उपासकांनी त्याची उपासना आत्म्याने व खरेपणाने केली पाहिजे (२४).

१. त्यात आत्म्याचा प्रतिसाद असून तो अंत:करणाच्या आतील मनुष्याशी संबंधित आहे:

अंत:करण नसलेली उपासना स्वीकारण्यास योग्य नाही – "आत्म्याने उपासना करा".

अ. ती देवाच्या मूलतत्त्वाशी समांतर आहे, म्हणजे ती भौतिक नाही.

ब. हृदय व भावना हेलावल्या जातात व त्यांच्यावर सत्याद्वारे प्रभाव पडतो. "सत्या"च्या संदर्भात बुद्धीचा उल्लेख अगोदरच आला आहे.

२. त्रैक्य देवाच्या व्यक्तित्वाचे आणि कार्याच्या सत्याचे प्रकटीकरण त्यात आहे: मन नसलेली उपासना स्वीकारण्यास योग्य नाही - "खरेपणाने उपासना करा."

अ. हा खऱ्या उपासनेचा आरंभबिंदू व मूळ आहे (१ करिंथ २:११,१२,१४). प्रकट केलेल्या सत्याला सोडून लोक अज्ञानाने उपासना करतात. ते आपल्याच भ्रष्ट कल्पना मनाशी बाळगून त्यावर आधारित उपासना करतात (रोम. १:२२,२३).

ब. हे अगदी स्पष्ट सत्य आहे की देवाने तारणारा म्हणून स्वत:चे व्यक्तित्व आणि कार्य यांचे ज्ञान करून दिले आहे (रोम. ३:२६; १५:९; योहान १:१-१४; ३:१६ आणि कार्य योहान १२:३२).

I. **ख्रिस्त स्पष्टपणे दाखवतो की खरी उपासना सत्यावर आधारित आहे. त्याच्या उपासकांनी त्याची उपासना सत्याने व खरेपणाने केली पाहिजे (२४).**

अ. देवाने स्वत: स्वत:ला व्यक्त केल्यानुसार आणि तो सांगतो तशीच त्याची उपासना करण्यावर खरी उपासना मुळावलेली आहे.

ब. देवाची उपासना कशी करावी यावर त्याने जे प्रकटीकरण दिले आहे त्याचा अनादर करून केलेली उपासना कितीही मनापासून केलेली असली तरी देव तिचा धिक्कार करतो.

१. तो उपासनेत प्रतिमा, मूर्त्या किंवा चित्रांना मनाई करतो (निर्गम २०:४; अनुवाद ४:१४-१९).

"कशाचीही आणि कसलीही" ही फार व्यापक स्वरूपातील मनाई आहे. मदतीचे साधन म्हणून कशाचाही उपासनेत वापर करायचा नाही. प्रतिमा आणि मूर्त्या अडथळा आणून

त्याचे गौरव कमी करतात किंवा दिसेनासे करतात. त्या देवाविषयी चुकीची कल्पना करून देऊन फसवतात. त्या देवाविषयीचे सत्य सांगू शकत नाहीत. यात आपल्या डोक्यात बाळगलेल्या मूर्त्यांचाही समावेश होतो. उदा. कधीकधी लोक म्हणतात "मला वाटते की देव असा असावा ... " .

२. **चुकीच्या पद्धतीने खऱ्या देवाची उपासना करण्यास मनाई आहे: ही बहकलेली उपासना होय.**

अ. सोन्याचे वासरू (निर्गम ३२:२-६).

ब. उज्जा आणि कोश. आयुष्यभर त्याचे रक्षण करण्याविषयी तो शिकला होता. कोश कसा वाहून न्यायचा याविषयी विशेष प्रकटीकरण दिलेले होते (गणना ४:५,६,१५). त्याची कृती जरी प्रामाणिक होती तरी स्वेच्छेची होती म्हणून त्याचा न्याय झाला (२ शमुवेल ६:३-७).

क. अहरोनाचे पुत्र (लेवीय १०:१-३).
देवाला उपासनेत जे हवे होते त्याविषयी नादाब व अबीहू यांनी अगदीच अनादर दाखवला. देवाने उपासना कशी केली पाहिजे हे प्रकट केले होते; आणि त्याचा त्यांनी पूर्णपणे अनादर केला म्हणून त्यांचा न्याय झाला.

ड. उपासनेसाठी विशिष्ट पद्धतीनेच व विशिष्ट पदार्थ वापरूनच धूपद्रव्य बनवायचे होते. (निर्गम ३०:३४-३८).

देवाच्या वचनात स्पष्ट परवानगी नसलेली सर्व पद्धतींची उपासना देव अमान्य करतो. ह्याविषयी जगाचे मन वळवणे किती कठीण आहे याची मला जाणीव आहे. याउलट जो पाठपुरावा त्यांच्या हाडाहाडांत आणि नसानसांत घट्ट बसलेला आहे तो त्यांना जखडून ठेवतो की, ते जे काही करतात त्याला पुरेशा परवानगी आहे, फक्त त्याद्वारे त्यांनी देवासाठी सन्मान व थोडाफार आवेश दाखवला तर पुरे. पण त्याची उपासना करण्यासाठी जे काही आपल्या स्वत:च्या आवेशाने आपण हाती घेऊ, ते देव निष्फळ तर ठरवतोच पण त्याचा अत्यंत तिरस्कार करतो. जर अशा विरुद्ध मार्गाने त्याच्या आज्ञेचा बेबनाव होत असेल तर त्याचा आपल्याला काय लाभ? देवाची वचने स्पष्ट व समजायला सोपी अशी आहेत. "यज्ञापेक्षा आज्ञापालन बरे." "ते व्यर्थ माझी उपासना करतात, कारण ते शास्त्र म्हणून जे शिकवतात ते असतात मनुष्याचे नियम." (१ शमुवेल१५:२२; मत्तय १५:९). या वचनात, विशषत: या विषयावर कोणी भर घालील तर ती लबाडी आहे. केवळ "इच्छेने उपासना" व्यर्थ आहे. देवाचे वचन कसोटी घेणारी तलवार आहे यावर निरीक्षण केल्यास आढळते की ते खरी उपासना व दूषित करणारी खोटी उपासना यात भेद करते. मग आपण लागलीच अनुमान

काढतो की हल्ली सर्वसामान्यपणे होणाऱ्या दैवी उपासनेचे स्वरूप केवळ भ्रष्टाचाराखेरीज दुसरे काहीही नाही. कारण देवाची योग्य सेवा करण्याकरता देवाने जे आज्ञापिले आहे त्याचा किंवा त्याने जे अमान्य ठरवले आहे त्याचा लोक मुळीच आदर करत नाहीत व त्याने लावून दिलेली शिस्तही पाळत नाहीत. तर असे धरून चालतात की त्यांना स्वत:च्या योजनेनुसार उपासना पद्धत वापरण्याचा परवानाच मिळाला आहे. आणि नंतर आपण त्याद्वारे त्याचे आज्ञापालन करत आहोत अशी समजूत करून घेतात. जर मी बोलतो त्यात अतिशयोक्ती वाटत असेल तर ते ज्याला सर्वसाधारण उपासना म्हणतात त्यातील प्रत्येक कृतीची चाचणी होऊ द्या. मी धाडसाने म्हणतो की त्यातील केवळ दहावा भाग त्यांच्या मेंदूतून उपजला नसेल. आणखी काय म्हणावे? सर्व बनावट उपासनेचा देव धिक्कार व तिरस्कार करतो आणि ती दोषी ठरवतो. गुणवत्ता नसलेल्या आज्ञापालनापासून आपल्याला दूर राखण्यासाठी आपल्याला लगाम घाला यला त्याच्या वचनाचा तो वापर करतो. त्याचे जू झुगारून देऊन आपल्याच कल्पनांमागे आपण भटकत राहातो, आणि त्याला उपासना सादर करतो, तेव्हा ते काम मानवाने अविचाराने केलेले असते. मग त्यामुळे आपल्याला कितीही आनंद झाला तरी त्याच्या दृष्टीने ते व्यर्थ, किरकोळ, इतकेच नव्हे तर अधम व प्रदूषित काम असते

– John Calvin, *The Necessity of Reforming the Church*, pp. 7,11

उपासना व भावना - योहान ४:२०-२४

प्रस्तावना

भावना व खऱ्या आराधनेविषयी ए. डब्ल्यू टोझर खालील विचार मांडतात:

आपण आनंदी आराधक बनावे म्हणून देवाने आपली निर्मिती केली हे आपण कदापि विसरू नये. पण पापाने आपल्याला उपासना सोडून इतर सर्व गोष्टींकडे ओढले आहे. -"तुम्हाला क्षमाप्राप्ती मिळून तुमचा उद्धार झला आहे." देव आपल्याला आठवण करून देतो की, "मी तुमचा निर्माणकर्ता, मुक्तिदाता व प्रभू आहे, आणि मला तुमच्या उपासनेत आनंद आहे." मित्रहो, हे ऐकून तुम्हाला कसे वाटते मला ठाऊक नाही.- पण मला तर वाटते की मी पूर्ण अंत:करणाने देवाला प्रतिसाद दिला पाहिजे. आराधकांमध्ये माझी गणना होते याचा मला आनंद वाटतो. आता येथे "भावना" हा शब्द मनात येतो. आणि मला माहीत आहे की त्यावर तुमची लागलीच तीव्र प्रतिक्रिया होईल. मला असे काही लोक भेटले आहेत की त्यांनी अतिशय दुराग्रहाने मला म्हटले की आमच्या आत्मिक जीवनात व अनुभवात आम्ही भावनांना यत्किंचितही वाव देणार नाही. त्यावर माझे उत्तर आहे" हे तुमच्यासाठीच वाईट आहे." मी असे म्हणण्याचे कारण खरी उपासना कशाला म्हणायचे याविषयी मी माझी अगदी वास्तव व्याख्या शब्दांकित केली आहे ती अशी : उपासना म्हणजे अंत:करण भावनोत्कट होणे. ख्रिस्ती विश्वासात, आपण "भावणे किंवा वाटणे" हा शब्द धाडसाने व दिलगिरी वाटू न देता वापरायला हवा. ख्रिस्ती मंडळी म्हणून जर आपल्याविषयी काही वाईट बोलले जाणार असेल तर आपण भावशून्य लोक आहोत असे म्हटले जाईल.

— *Whatever Happened to Worship,* pp. 58

ख्रिस्ताने उपासनेविषयी जो बोध केला आहे त्याच्या प्रस्तावनेत चार गोष्टी आपल्या लक्षात येतात:

- **अ. ख्रिस्त व्यक्तिश: आणि प्रीतीने समाजाने बहिष्कृत केलेल्या व्यक्तिबरोबर खऱ्या उपासनेविषषी बोलत आहे.**
- **ब. नव्या करारातील ही उपासनेविषयीची मूलभूत शिकवण आहे.**
- **क. खऱ्या उपासनेचे मर्म व मूलभूत घटक येशू ख्रिस्त मांडत आहे.**
- **ड. खऱ्या उपासनेत ख्रिस्त स्थळ, इमारतीचे स्वरूप व बांधणी किंवा समारंभ यावर मुळीच जोर देत नाही.**

ख्रिस्ताच्या उपासनेविषयीच्या शिकवणीत या शास्त्रपाठात दोन बाबी ठळकपणे उठून दिसतात.

I. पहिली म्हणजे, केवळ दैवी प्रकटीकरणावर आधारित असलेल्या उपासनेलाच खरी उपासना म्हणून ख्रिस्त परवानगी देतो व अधिकृत ठरवतो. तुम्हाला ठाऊक नाही अशाची उपासना तुम्ही करता, आम्हाला ठाऊक आहे अशाची उपासना आम्ही करतो कारण यहूद्यांतूनच तारण आहे (४:२२).

देवाच्या व्यक्तिमत्वाचे व मुक्तीच्या कार्याचे सत्य, देवाच्या वचनात प्रकट केले आहे, ते ख्रिस्ताभोवती केंद्रित आहे हाच उपासनेचा पाया व इंधन आहे. "त्याच्या उपासकांनी त्याची उपासना आत्म्याने व खरेपणाने केली पाहिजे" (२४).

अ. तो स्वकल्पनांमधून स्फुरलेली उपासना मग ती कितीही प्रामाणिकपणे केलेली असली तरी तिचा धिक्कार करतो." तुम्हांला ठाऊक नाही अशाची तुम्ही उपासना करता, आम्हांला ठाऊक आहे अशाची उपासना आम्ही करतो (व.२२) ... उपासना आत्म्याने व खरेपणाने केली पाहिजे (व.२४).

स्वनिर्मित कल्पना व तर्क हे देव कोण आहे याविषयी नेहमी विपर्यास करतात व खऱ्या उपासनेत ते स्वीकारण्यास योग्य नाही. योग्य देवाची अयोग्य पद्धतीने केलेली उपासना सुद्धा देव धिक्कारतो.

ब. ते देवाकडून झालेले देवाविषयीचे प्रकटीकरण आहे व तोच केवळ खऱ्या उपासनेचा पाया आहे. आम्हांला ठाऊक आहे अशाची उपासना आम्ही करतो (२२).

देवाच्या थेट बोलण्याद्वारे व वस्तुनिष्ठ प्रकटीकरणाद्वारे देवाविषयीच्या सत्याचे ज्ञान होते. आता ते लिखित स्वरूपात देवाचे वचन म्हणून कायमस्वररूपी उपलब्ध आहे. देवाच्या प्रकटीकरणाने लावून दिल्यानुसार खरी उपासना आधारित आहे. आपला देव कोण आहे असे आपल्याला वाटते, तसेच त्याची उपासना कशी करावी याचे ते नियमन करून देते. एखादी गोष्ट उपासनेला सहाय्यक ठरू शकेल म्हणून आपल्याला ती कितीही बरोबर वाटली तरी आपण वचनाच्या पलीकडे जाऊ शकत नाही (मेणबत्या पेटवणे किंवा फोटो लावणे). वचनात योग्य देवाची अयोग्य पद्धतीने उपासना करण्याची भरपूर उदाहरणे दिली आहेत (निर्गम ३२:२-६). वचनात प्रकट न केलेल्या पद्धतीची उपासना करण्याचा मार्ग निवडण्यासाठी मानवाला स्वैर सोडलेले नाही.

क. प्रकट केलेल्या सत्याचे केंद्रस्थान व विषय मुक्ती हा आहे, तेच उपासनेचे मूळ आहे. कारण यहूद्यांतूनच तारण आहे (व. २२).

ते ख्रिस्ताला सार्वकालिक पुत्र म्हणून त्याच्या गौरवी व्यक्तिमत्वात आणि मानवधारी होण्यासाठी त्याने स्वत:हून धारण केलेल्या अमर्याद नम्रतेत प्रकट करते. त्याच्या बदलीच्या मरणाच्या कार्यात त्याने प्रत्यक्षात सादर केलेली सर्व गौरवी परिपूर्णता देखील ते प्रकट करते.

ड. ज्या मुक्तिदात्याद्वारे मुक्तीचे काम सिद्धीस गेले तोच प्रकटीकरणाचे व उपासनेचे केंद्र आहे.

तारणाचे ज्ञान यहूद्यांकडून प्राप्त झाले आहे. जुन्या करारातील चिन्हे व भाकितांद्वारे ख्रिस्ताविषयीचे ज्ञान व त्याचे मुक्तीचे कार्य प्रकट झाले आहे. त्यात अर्पण पद्धतींचा व स्तोत्रे २२, ६९ आणि यशया ५३ सारख्या भाकितांचा समावेश होतो. ख्रिस्ताविषयीचे सत्य हे खऱ्या उपासनेचे इंधन व पाया आहे. त्या स्त्रीने स्थळावर लक्ष केंद्रित केले आणि उपासनेचे केंद्र व उद्दिष्ट असलेल्या व्यक्तीकडेच पूर्णपणे दुर्लक्ष केले. ख्रिस्तकेंद्रित उपासना आपल्याला स्वर्गातील उपासनेत पाहायला मिळते.

तेव्हा वडील मंडळापैकी एक जण मला म्हणाला, "रडू नको; पाहा, यहूदा वंशाचा सिंह, दाविदाचा अंकुर ह्याने जय मिळवला; म्हणून तो तिचे सात शिक्के फोडून ती उघडण्यास योग्य ठरला आहे." तेव्हा राजासन व चार प्राणी ह्यांच्यामध्ये व वडीलमंडळ ह्यांच्यामध्ये, ज्याचा जणू काय वध करण्यात आला होता, असा कोकरा उभा राहिलेला मी पाहिला; त्याला सात शिंगे व सात डोळे होते, ते सर्व पृथ्वीवर पाठवलेले देवाचे सात आत्मे आहेत. त्याने जाऊन राजासनावर जो बसलेला होता त्याच्या उजव्या हातातून ती गुंडाळी घेतली. त्याने गुंडाळी घेतली तेव्हा ते चार प्राणी व चोवीस वडील कोकऱ्याच्या पाया पडले. त्या प्रत्येकाजवळ वीणा व धुपाने भरलेल्या सोन्याच्या वाट्या होत्या; त्या वाट्या म्हणजे पवित्र जनांच्या प्रार्थना होत. ते नवे गीत गाऊन म्हणतात, "तू गुंडाळी घ्यावयास व तिचे शिक्के फोडावयास समर्थ आहेस, कारण तू वधला गेला होतास आणि तू रक्ताने सर्व वंश, निरनिराळ्या भाषा बोलणारे, लोक व राष्ट्रे ह्यांमधून आमच्या देवासाठी विकत घेतले आहेत. आणि आमच्या देवासाठी त्यांस राज्य व याजक असे केले आहे आणि ते पृथ्वीवर राज्य करतील." तेव्हा मी पाहिले तो राजासन प्राणी व वडील ह्यांच्याभोवती अनेक देवदूतांची वाणी ऐकू आली. आणि त्यांची संख्या आयुतांची आयुते व सहस्रांची सहस्रे होती. ते मोठ्याने म्हणत होते, "वधलेला कोकरा सामर्थ्य, धन, ज्ञान, बल, सन्मान, गौरव व धन्यवाद ही घेण्यास योग्य आहे." आणि स्वर्गात, पृथ्वीवर, पृथ्वीच्या खाली व समुद्रावर जो प्रत्येक सृष्ट प्राणी आहे तो, आणि त्यातील सर्व वस्तुजात ह्यांस मी असे म्हणताना ऐकले, "राजासनावर बसलेला ह्याला व कोकऱ्याला धन्यवाद, सन्मान, गौरव व पराक्रम ही युगानुयुग आहेत." तेव्हा ते प्राणी म्हणाले, "आमेन;" आणि वडील मंडळाने पाया पडून नमन केले (प्रकटी. ५:५-१४).

इ. जिवंत देवाच्या सत्यतेचा देवाच्या वचनात सामना होतो व अनुभव येतो: त्याचे वचन त्याच्यापासून विभक्त होऊ शकत नाही (इब्री. ४:१२,१३).

"कारण देवाचे वचन सजीव, सतेज, कोणत्याही दुधारी तरवारीपेक्षा तीक्ष्ण, जीव व आत्मा, सांधे व मज्जा यांस भेदून आरपार जाणारे आणि मनाच्या भावना व कल्पना यांचे परीक्षक असे आहे. आणि त्याच्या दृष्टीला अदृश्य अशी कोणतीही सृष्ट वस्तु नाही, तर ज्याच्याबरोबर आपला संबंध आहे त्याच्या दृष्टीला सर्व उघडेवाघडे आहे" (इब्री. ४:१२-१३).

तर सेनाधीश परमेश्वरालाच पवित्र माना; त्याचेच भय व धाक धरा; म्हणजे तो तुम्हांस पवित्र स्थान होईल; तथापि इस्राएलाच्या उभ्या घराण्यात तो ठेच लागण्याचा धोंडा व अडखळण्याचा खडक आणि यरुशलेमाच्या रहिवाश्यांस पाश व सापळा असा होईल ... ते तुम्हाला म्हणतील, "भूतवैद्यांस व छांछूं करणाऱ्या मांत्रिकांस विचारावयास जा;" तेव्हा म्हणा, "लोकांनी आपल्या

देवाला विचारू नये काय? जिवंतांकरता मेलेल्यांस विचारावे काय? धर्मशास्त्र व विधी याकडे पाहा!" याप्रमाणे ते न बोलल्यास निश्चये प्रभातसमय नाही (यशया ८:१३-१४; १९-२०).

१. आपण लिखित वचनातून त्याची वाणी ऐकतो.

म्हणून पवित्र आत्म्याने म्हटल्याप्रमाणे *"आज जर तुम्ही त्याची वाणी ऐकाल तर ... आपली मने कठीण करू नका"* (इब्री ३:७-८ब). लेखक स्तोत्र ९५ मधून संदर्भ वचन घेऊन ती पवित्र आत्म्याची सध्याची वाणी असल्याप्रमाणे सादर करत आहे! पवित्र आत्मा आता सध्याच्या वर्तमान काळात वचनाद्वारे बोलतो.

२. आपल्याला देवाकडे नेण्यासाठी पवित्र आत्मा देवाच्या वचनाद्वारे काम करतो.

कारण आमची सुवार्ता केवळ शब्दाने नव्हे तर सामर्थ्याने, पवित्र आत्म्याने व बहुत निर्धाराने तुम्हांस कळवण्यात आली.; तसेच तुम्हांकरता आम्ही तुम्हांमध्ये कसे होतो हे तुम्हांस ठाऊक आहे. तुम्ही फार संकटात असताना पवित्र आत्म्याच्या द्वारा मिळालेल्या आनंदाने वचन स्वीकारून आमचे व प्रभूचे अनुकारी झाला (१ थेस्स. १:५-६).

३. ख्रिस्त म्हणतो की त्याची वचने त्याच्यापासून विभक्त होऊ शकत नाहीत.

माझी वचने ऐकून कोणी पाळीत नाही तर त्याचा न्याय मी करीत नाही; कारण मी जगाचा न्याय करण्यासाठी नाही, तर जगाचे तारण करण्यासाठी आलो. जो मला अव्हेरतो व माझ्या वचनांचा स्वीकार करीत नाही त्याचा न्याय करणारा एक जण आहे; जे वचन मी सांगितले तेच शेवटल्या दिवशी त्याचा न्याय करील (योहान १२:४७,४८).

फ. आपण सामूहिक सभेत वचन वाचायचे व घोषित करायचे कारण त्याद्वारे देव आपल्याला जवळ घेतो (१ तीमथ्य ४:१३; २ तीमथ्य ४:२,३).

१. प्रेषितांनी सर्व मंडळ्यांमध्ये वचन वाचण्याची आज्ञा दिली.

मी येईपर्यंत वाचन, बोध व शिक्षण यांकडे लक्ष ठेव (१ तीमथ्य ४:३).

२. आपल्याला सामूहिक सभेत जे समजण्याइतक्या वयाचे आहेत त्यांना वचन घोषित करायचे आणि शिकवायचे आहे (२ तीमथ्य ४:१,२).

मग ते सर्व लोक एकचित्त होऊन पाणी वेशीच्या चौकात एकत्र जमले व एज्रा शास्त्री यास म्हणाले, परमेश्वराने इस्राएल लोकांस विहीत केलेला नियमशास्त्राचा मोशेकृत ग्रंथ घेऊन या. तेव्हा मंडळीतील स्त्रीपुरुषांपुढे व ज्यांस ऐकून समजण्याचे सामर्थ्य होते त्या सर्वांपुढे एज्रा याजकाने तो धर्मग्रंथ आणला. त्यातील वचने त्याने पहाटपासून दोन प्रहरपर्यंत पाणीवेशी समोरच्या चौकात स्त्रीपुरुषांपुढे व ज्यांस ऐकून समजण्याचे सामर्थ्य होते त्यांच्यापुढे वाचली आणि सर्व लोकांनी नियमशास्त्राचा ग्रंथ कान देऊन ऐकला (नहेम्या ८:१-३).

३. **वचन वाचून शिकवण्यासाठी लक्ष देऊन ऐकता येईल असे वातावरण असणे गरजेचे आहे (१ करिंथ १४:१२,२३,२६).**

४. **उन्नतीसाठी ज्या गोष्टी करायच्या त्याकरता सभ्यता व शिस्त राखणे गरजेचे आहे (१ करिंथ १४:२०).**

II. **दुसरी गोष्ट म्हणजे जी उपासना अंत:करणातून येते त्याच उपासनेला ख्रिस्त परवानगी देऊन अधिकृत लेखतो. त्याच्या उपासकांनी त्याची उपासना आत्म्याने व खरेपणाने केली पाहिजे (व. २४).**

अ. **आत्मा, ज्याला आतील मनुष्य व हृदय म्हटले आहे तो उपासना करताना भावना व्यक्त करायला सुचवतो.**

आत्म्याने उपासना करणे याचा अर्थ काय? वचन २४ मधील आत्मा हा शब्द मानवी आत्म्याच्या म्हणजे आतील मनुष्याच्या संदर्भात वापरला आहे. उपासना आतून बाहेर प्रवाहित व्हायला हवी. आपण योग्य वेळी, योग्य स्थळी असणे, योग्य शब्द वापरणे, योग्य आचरण करणे, योग्य पेहराव करणे, योग्य औपचारिकता ठेवणे, योग्य संगीत वाजवणे आणि योग्य मन:स्थिती असणे हे महत्त्वाचे नसते. उपासना ही बाह्य कृती नाही की ज्यासाठी वातावरण निर्मितीची गरज आहे. ती अंतर्यामात, आत्म्यात घडून येते.

— John MacArthur, *The Ultimate Priority*. p. 116-117

ब. **आत्म्याचा संबंध मानवाच्या अमूर्त मनाशी आहे. तो देवाच्या अमूर्त स्वभावाशी म्हणजे त्याच्या आत्म्याशी समांतर आहे, आणि आतील मानवाचा प्राथमिक घटक आहे अंत:करणातील प्रेम.**

क. **अंत:करणातील प्रेम व भावना ही उपासनेत उपस्थित असलीच पाहिजेत. नाहीतर ती उपासना स्वीकारण्यास योग्य नसून व्यर्थ आहे.**

हे लोक ओठांनी माझा सन्मान करतात परंतु त्यांचे अंत:करण माझ्यापासून दूर आहे. ते मनुष्यांचे नियमशास्त्र म्हणून शिकवून माझी निरर्थक भक्ती करतात (मत्तय १५:८,९).

अंत:करणाशिवाय उपासना होऊच शकत नाही. नाहीतर ते रंगमंचावरील नाट्य असते. म्हणजे आपण प्रत्यक्षातील ती व्यक्ती नसून तिची भूमिका वठवत असतो. तो ढोंगी असतो. ढोंगी या शब्दामागची कल्पना रंगमंचावरील नट अशीच आहे. उपासनेत पूर्ण नसलो तरी आम्ही उपासना करीत आहोत असे आपण म्हणू शकू. पण आपल्यात सच्चेपणा नसताना आपण उपासना करीत आहोत असे आपण म्हणू शकत नाही.

— Stephen Charnock, *The Existence and Attributes of God,* p, 225-226

ड. खऱ्या सुसंवादात ज्या भागावर आत्म्याचा परिणाम होतो तो म्हणजे भावना. पुनरुज्जीवनात नवीन मनापेक्षा अधिक काही प्राप्त होते. ते आपल्याला नवीन हृदयासह नवीन भावनाही देते. आता आपण देवावर प्रीती करू शकतो. आपल्या प्रेमाने व भावनांनी देवाचा आदर करून त्याचा सन्मान करू शकतो. देवाने आपले पाषाणमय हृदय काढून आपल्याला मांसमय हृदय दिले आहे (यहेज्केल ३६:२६).

१. **त्यात पवित्र आत्म्याचा आनंद असतो.**

तुम्ही फार संकटात असताना पवित्र आत्म्याच्या द्वारा मिळालेल्या आनंदाने वचन स्वीकारून आमचे व प्रभूचे अनुकारी झाला (१ थेस्सलनी १:६).

२. **आनंदाची भावना व्यक्त करणे हा नित्याच्या ख्रिस्ती जीवनातील अनुभवांचा एक भाग आहे.**

त्याला पाहिले नसताही तुम्ही त्याच्यावर प्रीती करता; आता जरी त्याला तुम्ही पाहात नाही, तरी त्याच्यावर विश्वास ठेवीत तुम्ही अनिर्वाच्य व गौरवयुक्त आनंदाने उल्लासता (१ पेत्र १:८).

३. **सहजस्फूर्त भावना व्यक्त होणे हे स्वर्गीय उपासनेचे गुणवैशिष्ट्य आहे. (प्रकटी. ५;९ नवे गीत; मोठ्याने ५:१२; ५:१४ मध्ये म्हणतच राहिले.)**

पवित्र जनांमधील आनंद व प्रेम कशाहीपेक्षा अतिशय महान व जोमदार, अनिर्वाच्य गोडव्याच्या चैतन्यदायी संवेदनेने अंत:करणावर छाप पाडणारे, तीव्रतेने हेलावणारे, प्रोत्साहनदायी, त्यांना गुंतवून ठेवणारे, त्यांना अग्निच्या जिभांप्रमाणे बनवणारे आहे. आणि अशा प्रेम व आनंदाच्या भावना नसतील तर भावना हा शब्द भाषेत काही उपयोगाचा नाही...म्हणूनच स्वर्गाचा धर्म, मुख्यत्वे पवित्र प्रीती व आनंदाने भरलेला आहे; त्यात विपुल प्रमाणात प्रीती समाविष्ट आहे. त्यामुळे खऱ्या धर्मात प्रीती विपुल प्रमाणात समाविष्ट असते यात शंकाच नाही. जर कोणत्याही गोष्टीचे खरे स्वरूप जाणून घ्यायचे असेल तर जेथे ती गोष्ट परिपूर्ण शुद्ध स्वरूपात सापडेल तेथे जाऊन शोध घ्यावा लागेल.

— Edwards, *Religious Affections*, p. 3

ई. स्तुतीची गीते गाण्याचा गाभ्याचा घटक म्हणजे आदर व आनंदमिश्रित भावना.

१. **देवाचे व्यक्तिमत्व व कार्याला प्रतिसाद म्हणून उत्साहाने व अर्थपूर्ण रीतीने गीते गायला हवीत.**

अहो धार्मिकहो, परमेश्वराचा धन्यवाद करा; सरळांस स्तुतीगान शोभते. वीणेवर परमेश्वराचे उपकारस्मरण करा; दशतंतू वाद्यांवर त्याचे गुणगान गा. त्यापुढे नवे गीत गा; जयघोष करीत

कुशलतेने वाद्ये वाजवा. कारण परमेश्वराचे वचन सरळ आहे; त्याची सर्व कृती सत्याची आहे (स्तोत्र ३३:१-४).

अहो पृथ्वीवरील सर्व लोकहो, देवाचा जयजयकार करा. त्याच्या नावाचा महिमा गा, त्याच्या स्तुत्यर्थ त्याचे गौरव करा. देवाला म्हणा, तुझी कृत्ये किती भयप्रद आहेत; तुझ्या महाबलेकरून तुझे वैरी तुला वश होतात. सर्व पृथ्वीवरील लोक तुला नमतील व तुझी स्तोत्रे गातील, तुझ्या नामाची स्तोत्रे गातील (स्तोत्र ६६:१-४).

२. टाळ्या वाजवून गाणी गाता येतील.

अहो सर्व लोकहो टाळ्या वाजवा; उत्साहशब्दांनी देवाचा जयजयकार करा. कारण परमेश्वर परात्पर व भयप्रद आहे; तो अखिल पृथ्वीचा महान सार्वभौम राजा आहे. तो लोकांस हतवीर्य करून आमच्या ताब्यात देतो; राष्ट्रांस आमच्या पायाखाली घालतो. त्याचा आवडता याकोब यास ज्या वतनाचाअभिमान होता, ते त्याने आम्हांसाठी निवडले आहे. जयघोष होत असता देव वर गेला आहे,करण्याचा शब्द होत असता परमेश्वर वर गेला आहे. देवाची स्तुतिस्तोत्रे गा; आमच्या राजाचीस्तुतिस्तोत्रे गा, स्तुतिस्तोत्रे गा. कारण देव सर्व पृथ्वीचा राजा आहे; तुम्ही लक्षपूर्वक त्याची स्तुतिस्तोत्रे गा (स्तोत्र ४७:१-७).

३. सामूहिक सभेसाठी जेव्हा आपण एकत्र जमतो तेव्हा आपण आनंदाने स्तुतिगीते गावीत असा आपल्याला बोध केला आहे.

याहो या, आपण परमेश्वराचा जयजयकार करू या; आपल्या तारणदुर्गाचा जयजयकार करू. उपकारस्मरण करीत आपण त्याच्यासमोर जाऊ, स्तोत्रे गाऊन त्याचा जयजयकार करू. कारण परमेश्वर थोर आहे; तो थोर राजा आहे, तो सर्व देवांहून श्रेष्ठ आहे (स्तोत्र ९५:१-३).

अहो पृथ्वीवरील सर्व लोकहो, परमेश्वराचा जयजयकार करा. हर्षाने परमेश्वराची सेवा करा; गायन करीत त्याजपुढे या (स्तोत्र १००:१,२).

आणि धार्मिक प्रेम पूर्णपणे व उत्सफूर्तपणे व्यक्त करण्यासाठी देवाची स्तुती गाण्याचे कर्तव्य त्याने नेमून दिल्याचे दिसते. गद्याऐवजी देवाने ते पद्यात आपल्याला का व्यक्त करायला सांगितले याचे दुसरे कोणतेही निश्चित कारण असू शकत नाही. आपण संगीताचा वापर आपल्या स्वभावाच्या चौकटीत राहून करायचा आहे, कारण या गोष्टींमध्ये आपले प्रेम उद्दिपित करण्याची क्षमता असते.

— Jonathan Edwards, *On Religious Affections* (pp. 38-39)

४. स्तुतिगान करताना मोठा आवाज करणारी वाद्ये वापरायचा आपल्याला बोध केला आहे.

परमेश्वराचे स्तवन करा! देवाचे त्याच्या पवित्र स्थानी स्तवन करा; त्याच्या सामर्थ्याच्या नभोमंडळात त्याचे स्तवन करा. त्याच्या पराक्रमाच्या कृत्यास्तव त्याचे स्तवन करा; त्याच्या थोरवीच्या वैपुल्यानुसार त्याचे स्तवन करा. करणा वाजवून त्याचे स्तवन करा. सतार व वीणा

वाजवून त्याचे स्तवन करा. डफ वाजवून व नृत्य करून त्याचे स्तवन करा. तंतुवाद्ये व बासरी वाजवून त्याचे स्तवन करा. खणखणणारे टाळ वाजवून त्याचे स्तवन करा. झणझणणाऱ्या झांजा वाजवून त्याचे स्तवन करा. प्रत्येक श्वासवान प्राणी परमेशाचे स्तवन करो. परमेश्वराचे स्तवन करा (स्तोत्र १५०).

५. **त्याचे गौरव उंचावण्यासाठी गीते गायची आहेत.**

जो आभाररूपी यज्ञ करतो तो माझे गौरव करतो. आणि जो आपला मार्ग नीट ठेवतो त्याला मी ईश्वरकृत तारण प्राप्त करून देईन (स्तोत्र ५०: २३).

तू माझा विलाप दूर करून मला नाचायला लावले आहे; तू माझे गोणताट काढून मला हर्षाचा कटिबंध नेसवला आहे; यासाठी की माझ्या आत्म्याने तुझे गुणगान गावे; गप्प राहू नये; हे परमेश्वरा, माझ्या देवा, मी सर्वकाळ तुझे उपकारस्मरण करीन (स्तोत्र ३०:११,१२).

मनुष्यांची मने देवाच्या आत्म्याच्या प्रभावाखाली नसतात यात खरोखर वादच नाही. ती फार अस्थिर आहेत: कारण आत्मिक व सार्वकालिक गोष्टी खूप महान आहेत व त्यांना अमर्याद महत्त्व आहे; मानवाच्या ठायी इतकी विवेकशून्यता असते; तरी ते फार थोड्या प्रमाणात प्रेरित व प्रभावित होतात. त्यांना समजल्यानुसार व त्यांच्या पात्रतेप्रमाणे थोड्या फार प्रमाणात या गोष्टींचा त्यांच्यावर प्रभाव पडतो. हे फक्त देवाच्या आत्म्यानेच होते यात खात्रीने वादच नाही

— Jonathan Edwards, *The Distinguishing Marks of a Work of The Spirit of God*, pp. 262

समारोप

भावनात्मकवादाने भावना ओळखण्यात आणि कोणत्याही प्रकारे उघडपणे दाखवलेल्या भावना सरळ धिक्कारण्यात धोका असतो. हे एका टोकाला जाण्यासारखे आहे. देवाच्या वचनाने मार्गदर्शन झालेल्या भावना खऱ्या उपासनेसाठी अत्यावश्यक घटक आहेत. अशा प्रकारच्या भावना वचनकेंद्रित, ख्रिस्ताला उंचावणाऱ्या अर्थपूर्ण, जोमदार स्तुतिगान सादर करतात.

यावरून आपल्याला समजेल की सर्वच धार्मिक भावना भरीव नसून त्या पोकळ आहेत असे म्हणून जे त्यांचा धिक्कार करतात, ते किती घोडचूक करतात. हल्ली अशा प्रकारचा लोकांचा कल रूढ होत असल्याचे आढळून येत आहे. याचे कारण अनेकांनी सध्याच्या विशेष काळात मनाचा योग्यभाव व्यक्त केला नाही, आणि त्यांच्या हस्ते आवेशाच्या भरात खूप चुका झाल्या. काहींच्या आवेशाने कळस गाठला पण त्याचा परिणाम शून्य झाला. आणि काहींनी सामर्थ्याने आनंद व आवेशाची उंची गाठली पण लवकरच ओकीकडे परतणाऱ्या कुत्र्याप्रमाणे ते मागे फिरले: त्यामुळे धार्मिक प्रेमभावनांचे महत्त्व मोठ्या प्रमाणात कमी झाले. इतके की खऱ्या धर्मामध्ये त्यांचे अस्तित्वच नाही असे वाटावे. अशा प्रकारे आपण एका टोकाकडून दुसऱ्या टोकाकडे सहज आणि सरळ धावत गेलो. अगदी अल्प

काळापूर्वी आपण दुसऱ्या टोकापाशी होतो. तेव्हा सर्व प्रकारच्या उच्च धार्मिक प्रेमभावनांकडे खऱ्या कृपेची अत्युच्च दर्जाची सरावाची गोष्ट म्हणून पाहाण्याचा मनाचा प्रचलित कल होता. त्या प्रेमाचा उगम व स्वरूपाविषयी व ते कसे उफाळून येते याविषयी काही चौकशा केल्या जात नव्हत्या. जरी एखादी व्यक्ती फारशी भावुक झाल्याची व चैतन्य असलेली दिसली नाही, पण भरपूर धार्मिक विचार व्यक्त करत असली, आणि अतिशय माया व काळजी दाखवत असली, आणि लोक म्हणतात त्याप्रमाणे भरलेली किंवा भरत असलेली वाटली, तर हे सारे तपासून पाहाण्याची गरज वाटण्याची ती बाब नव्हती, आणि अशी व्यक्ती आत्म्याने भरलेली आहे व देवाच्या कृपाळुपणाच्या प्रभावी अनुभव तिला आला आहे असा निष्कर्ष काढला जात असे. तीन चार वर्षांपूर्वी ही टोकाची समजूत रूढ होती. पण कालांतराने सर्व धार्मिक प्रेमभावनांची किंमत करून त्यांची प्रशंसा करण्याऐवजी त्यांच्यामध्ये फरक न करता त्या सर्वच निरुपयोगी ठरवून त्यांचा धिक्कार करणे प्रचलित होऊ लागले. येथेच सैतानाची कपटी वृत्ती लक्षात येते … सैतान नेहमीच त्याच्या फायद्यासाठी दुसऱ्या मार्गाने काम करू लागतो. त्याची जाहिरात व पाठपुरावा करून ते प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतो. ते हे की सर्व प्रेमभावना आणि मनाला जाणवणाऱ्या धार्मिक भावनांचा आदर करावा असे त्यात काही नाही, उलट त्या टाळायला हव्यात, आणि अपायकारक प्रवृत्ती म्हणून त्यापासून स्वत:चे काळजीपूर्वक रक्षण करायला हवे. त्याला ठाऊक आहे की हाच एक मार्ग आहे. सर्व धर्म एक निर्जिव कार्यक्रम अशा पातळीवर आणून ठेवायचा व प्रभावीपणे सर्व आध्यात्मिकतेचे व देवभिरूपणाचे सामर्थ्य बंद करून टाकायचे. अर्थातच खऱ्या धर्मात प्रेमभावनेशिवाय दुसरेही काही जरूर आहे. तरी खरा धर्म इतक्या मोठ्या प्रमाणात प्रेमभावनेत सामावलेला आहे की त्याशिवाय खरा धर्म असूच शकत नाही. ज्याच्या ठायी धार्मिक प्रेमभावना नाही, तो आध्यात्मिक मृतावस्थेत आहे; आणि त्याच्या अंत:करणावर देवाच्या आत्म्याचा सामर्थ्यशाली, जागृत करणाऱ्या तारणाचा प्रभाव पडला नसल्याने पूर्णत: तो कंगाल आहे. ज्यामध्ये प्रेमभावनेखेरीज दुसरे काहीच नाही तो खरा धर्मच नाही. त्यामुळे जेथे धार्मिक प्रेमभावना नाही तेथे खरा धर्मच नाही.

— Jonathan Edwards, *On Religious Affections* (Part 1, pp. 43-45)

देवाचे वचन, स्तुतिगीते आणि ख्रिस्ताचे गौरव - कलसै ३ :१६-१७

प्रस्तावना

अ. **आपल्या स्वभावामध्ये आपण जे काही बनलो आहोत तशीच कृती करण्याचा तो आपल्याला बोध करत आहे – नव्या जन्माने नवीन निर्मिती झाल्यामुळे – नवीन मनुष्य (वचने १०, १२).**

ब. **नवा मनुष्य ख्रिस्तासारखे आणि देवासारखे होण्यात सादर होतो कारण नवा मनुष्य देवाच्या प्रतिमेचा निर्माण केला होता (१० ब).**

क. **नवीन मनुष्याचा प्रमुख घटक म्हणजे देवाला स्तुतीची गीते गाणे.**
विश्वासी व्यक्तीसाठी उपासना आयुष्यभरासाठी लावून दिलेली गोष्ट असल्याने गीते गाणे हा उपासनेचा घटक आहे (१६).

ड. **स्तुतीची गीते गाणे हा देवाच्या वचनाचा थेट परिणाम कसा आहे, हे तो दाखवतो. तो गीते गाण्याविषयी पाच गोष्टी सांगतो.**

I. **पहिली गोष्ट म्हणजे, स्तुतिगीते गाणे, देवाचे वचन व ख्रिस्ताची सुवार्ता यात परस्पर संबंध आहे, ख्रिस्ताचे वचन तुम्हामध्ये सर्व ज्ञानाने भरपूर राहो (३:१६अ).**

अ. **देवाचे लिखित वचन ख्रिस्तावर केंद्रित आहे व त्याला ते उंचावते. देवाचे वचन … राहो.**

१. **त्याने अगोदरच ख्रिस्ताचे श्रेष्ठत्व जाहीर केले आहे (१:१५-१८), आणि त्याच्या दु:खसहनाने पूर्ण समेट सिद्धीस नेऊन त्याने देवाला संतुष्ट केले (१:२१-२२).**
मग तोच पुरेसा आहे हे त्याने जाहीर करून टाकले (१:२८,२९; २:७).

२. **वचनात अगदी आरंभापासूनच जाहीर केले आहे की ख्रिस्त शास्त्रलेखाचा विषय आहे.**
आणि मी तुझ्यामध्ये व स्त्रीच्यामध्ये आणि तुझ्या बीजामध्ये व तिच्या बीजामध्ये वैर ठेवीन; तो तुझे डोके फोडील आणि तू त्याची टाच फोडशील (उत्पत्ती ३:१५).

३. **प्रकटीकरण आणि शुभवर्तमानाचा आशय हा ख्रिस्त ही व्यक्ती व त्याचे कार्य यावर केंद्रित आहे (कलसै १:५, २५-२८).**

४. **ख्रिस्ताने म्हटले की तोच संपूर्ण शास्त्रलेखाचाचा विषय आहे (योहान ५:३९; लूक २४:२७; ४४-४५).**
तुम्ही शास्त्रलेख शोधून पाहाता; कारण त्यात आपणास सार्वकालिक जीवन प्राप्त होईल असे तुम्ही समजता; तेच माझ्याविषयी साक्ष देणारे आहेत (योहान ५:३९).

मग त्याने मोशे व सर्व संदेष्टे यांच्यापासून आरंभ करून सगळ्या शास्त्रातील आपणाविषयींच्या गोष्टींचा अर्थ त्यांस सांगितला … ह्यावर त्याने त्यांस म्हटले, ''मी तुमच्या बरोबर असताना

तुम्हांस सागितलेली माझी वचने हीच आहेत की मोशेचे नियमशास्त्र, संदेष्टे व स्तोत्रे यात मजविषयी जे लिहिलेले आहे ते सर्व पूर्ण होणे अवश्य आहे. तेव्हा त्यांस शास्त्रबोध व्हावा म्हणून त्याने त्यांचे मन उघडले (लूक २४:२७; ४४-४५).

ब. **देवाच्या वचनामध्ये नियंत्रण करणारा व सामर्थ्य देणारा प्रभाव आहे: ते एखाद्याच्या ठायी वसते तेव्हा अधिकाराने नियंत्रण ठेवते व प्रभाव पाडते, ते तुमच्या ठायी विपुलतेने राहते.**

"तुमच्या ठायी वसते" हा शब्दप्रयोग अंतर्यामावर नियंत्रण ठेवण्याच्या प्रभावावर जोर देतो. (स्तोत्र ११९:११ पाहा.) हाच शब्दप्रयोग पुढील वचनात वापरलेला दिसतो. त्यात काहीतरी नियंत्रण ठेवते, शासनव्यवस्था चालवते आणि अंतर्यामातील सान्निध्याने प्रभाव पाडते यावर जोर दिला आहे.

ह्यावरून ते कर्म मी करतो असे नव्हे तर माझ्याठायी वसणारे पाप करते (रोम. ७:१७).

ज्याने येशूला मेलेल्यांतून उठवले त्याचा आत्मा जर तुम्हांमध्ये वास करतो तर ज्याने ख्रिस्ताला मेलेल्यांतून उठवले तो तुम्हांमध्ये वास करणाऱ्या आपल्या आत्म्याने तुमची मर्त्य शरीरे जिवंत करील. बंधुजनहो आपण ऋणी आहोत, तरी देहस्वभावाप्रमाणे वर्तावयाला देहस्वभावाचे ऋणी नाही, जर तुम्ही देहस्वभावाप्रमाणे वर्तता तर तुम्ही मराल, परंतु जर तुम्ही आत्म्याने शरीराची कर्मे मारून टाकता, तर जिवंत राहाल (रोम. ८:११-१३).

क. **व्यक्तीच्या जीवनात देवाच्या वचनाचे परिणाम व्यावहारिक जीवन बदलण्याद्वारे दिसतात ... सर्व ज्ञानाने परस्परांना शिकवा व बोध करा (कलसै ३:१६ब).**

१. **त्याचा सर्व क्षेत्रांशी व गरजांशी संबंध असतो. ते "सर्व प्रकारचे ज्ञान" देते त्यामुळे सर्व लोकांना सर्व परिस्थितीत ज्ञानाचा व शक्तीचा पुरवठा होतो (कलसै २:२-३).**

२. **देवाच्या वचनाच्या सामर्थ्याच्या आपल्या जीवनातील अनुभवामुळे आपण जे काही शिकलो त्यामुळे आपण इतरांना शिकवून व बोध करून त्यात वाटेकरी करून घेतो.**
उदा: एक स्त्री ख्रिस्त पुरेसा आहे याविषयीच्या उपदेशात व पुस्तकात इतकी न्हाऊन चिंब झाली की पती गमावल्याच्या हानीतून ती सावरली.

ड. **जेव्हा देवाचे वचनाद्वारे आभारप्रदर्शन व गीत व्यक्त होते तेव्हा आत्म्याचे सामर्थ्य व सान्निध्य प्रकट झाल्याचा तो पुरावा असतो.**

१. **हे विधान इफिस ५:१८-२१ शी समांतर आहे. त्यात आत्म्याने गीते गाणे व आभारप्रदर्शन या गुणविशेषांचा समावेश आहे.**

२. **इफिस ५:१९,२० मध्ये जे परिणाम निष्पन्न होतात तेच परिणाम या वचनातही दिसतात कारण आत्मा आपल्याठायी वचनाद्वारेच कार्य करतो.**

**ई.	ख्रिस्ताची वचने आपल्या अंत:करणात राहण्याचा परिणाम ख्रिस्त केंद्रित गीतांनी स्तुती करण्यात होतो.**

**१.	वचनाद्वारे आत्मा कार्य करतो. ख्रिस्ताला उंचावणाऱ्या स्तुतीची गीते लिहून ती गाण्यास भाग पाडतो. गीत गाण्यातून "ख्रिस्ताचे वचन" व्यक्त होते.**

**२.	वाक्यप्रयोगाच्या रचनेद्वारे गीत गाणे हे थेट "ख्रिस्ताच्या वचनाशी" सांगड घालते.** "तुम्हांमध्ये राहो" हे क्रियापद एकच आहे पण त्याची तीन निराळी धातुसाधित विशेषणे आहेत. त्यातील पहिले यावर भर देते की जेव्हा ख्रिस्ताचे वचन आपल्यामध्ये राहते तेव्हा स्तोत्रे गीते व आत्मिक प्रबंध रचून गीत गाणे हा परिणाम दिसून येतो.

**३.	देवाचे वचन यावर जोर देते की ख्रिस्ताचे गौरवी व्यक्तित्व व त्याच्या कार्याच्या सत्याने अंत:करणाची अशी पकड घेतली जाते की त्याचा परिणाम नवीन गीतात होतो.**

स्तुतीचे भक्तिगीत किंवा स्तुतिगीत हे त्यावेळी प्रत्यक्षात चालू असलेल्या देवाच्या आत्म्याच्या कार्याचे किंवा खुद्द देवाचे वैशिष्ट्यपूर्ण व्यक्त होणे असते (१ करिंथ १४:२५). यात स्वैर गीतरचनेचा...आणि नवीन ख्रिस्ती गीतांचाही समावेश असतो.

DNTT, Vol. lll p. 672.

**४.	स्तुती करणे, गीते गाणे व संपूर्ण आराधनेचे, सत्य हेच उगमस्थान आहे (योहान ४:२४).**

परमेश्वराचे गुणगान नवे गीत गाऊन करा कारण त्याने अद्भुत कृत्ये केली आहेत; त्याच्या उजव्या हाताने, त्याच्या पवित्र भुजाने तारण साधले आहे. परमेश्वराने आपण सिद्ध केलेले तारण विदित केले आहे; राष्ट्रांसमक्ष आपले न्यायत्व प्रकट केले आहे. इस्राएलाच्या घराण्यावरील आपली दया व सत्यता यांचे स्मरण केले आहे; पृथ्वीच्या सर्व सीमांनी आमच्या देवाने सिद्ध केलेले तारण पाहिले आहे (स्तोत्र ९८:१-३).

परमेश्वराचे गुणगान नवे गीत गाऊन करा. हे सर्व पृथ्वी परमेश्वराचे गुणगान कर. परमेश्वराचे गुणगान करा, त्याच्या नामाचा धन्यवाद करा. त्याने केलेल्या तारणाची घोषणा प्रतिदिनी करा. राष्ट्रांमध्ये त्याचे गौरव, सर्व लोकांमध्ये त्याची अद्भुत कृत्ये जाहीर करा (स्तोत्र ९६:१-३).

**II.	दुसरी गोष्ट, स्तुतीच्या गीतांची विविध विषयांनुसार वर्गवारी केली आहे; स्तोत्रे , गीते व आत्मिक प्रबंध (१६क).**

**अ.	देवाचे व्यक्तित्व व कार्याविषयीची जी गीते वाद्यांच्या साथीने गाईली जातात, ती "स्तोत्रे". ही परिभाषा ४९ स्तोत्रांना शीर्षक म्हणून वापरली आहे.**

१.	"स्तोत्र" या शब्दावरील जोर व त्याचा अर्थ देवाचे व्यक्तित्व आणि कार्य याविषयी वाद्यांसह

संगीताच्या साथीने गीते गाणे असे सूचित करतो.

निधर्मी ग्रीक काव्यात होमर पासून पुढील लोकांनी स्तोत्रांचा वापर केला. या शब्दाचा मूळ अर्थ उपटणे (केस), धनुष्याच्या दोरीतून टणात्कार काढणे, आणि वीणेची किंवा इतर कोणत्याही तंतुवाद्याची तार छेडणे असा होतो. स्तोत्र हे नाम सामान्यपणे वाद्याचा नाद किंवा प्रत्यक्षात सूर काढणे या संदर्भात वापरले जाते.

DNTT Vol lll, p. 671

तर तंतुवाद्य वाजवण्यात निपुण असा मनुष्य शोधून आणण्याची स्वामींनी आपल्या तैनातीच्या सेवकांस आज्ञा द्यावी ... तो आपल्या हाताने वाद्य वाजवील व आपल्याला बरे वाटेल (१ शमुवेल १६:१६).

वाद्याच्या साथीने गीते गाण्यासाठी ग्रीक जगतात हा शब्द रूढ होता. उदा. मद्यधुंद होऊन ज्यांनी ख्रिस्ताचा उपहास केला त्यांच्याविषयी ६९ व्या स्तोत्रात त्याचा वापर केला आहे. वेशीत बसणारे माझ्याविषयी बोलत असतात, मी मद्यप्यांच्या गायनाचा विषय झालो (स्तोत्र ६९:१२).

२. **देवाच्या वचनात वाद्यांचा वापर करण्याचा बोध केला आहे.**

अहो धार्मिकहो, परमेश्वराचा जयजयकार करा; सरळांस स्तुतिगान शोभते. वीणेवर परमेश्वराचे उपकारस्मरण करा; दशतंतुवाद्यांवर त्याचे गुणगान गा. त्यापुढे नवे गीत गा; जयघोष करीत कुशलतेने वाद्ये वाजवा; कारण परमेश्वराचे वचन सरळ आहे; त्याची सर्व कृती सत्याची आहे (स्तोत्र ३३:१-४).

३. **ते आराधनेतील आनंद व उत्सवाचे स्वरूप द्विगुणित करते (स्तोत्र ३२:२-३).**

परमेश्वराचे स्तवन करा! देवाचे त्याच्या पवित्र स्थानी स्तवन करा; त्याच्या सामर्थ्याच्या नभोमंडळात त्याचे स्तवन करा. त्याच्या पराक्रमाच्या कृत्यास्तव त्याचे स्तवन करा; त्याच्या थोरवीच्या वैपुल्यानुसार त्याचे स्तवन करा. करणा वाजवून त्याचे स्तवन करा. सतार व वीणा वाजवून त्याचे स्तवन करा. डफ वाजवून व नृत्य करून त्याचे स्तवन करा. तंतुवाद्ये व बासरी वाजवून त्याचे स्तवन करा. खणखणणारे टाळ वाजवून त्याचे स्तवन करा. झणझणणाऱ्या झांजा वाजवून त्याचे स्तवन करा. प्रत्येक श्वासवान प्राणी परमेशाचे स्तवन करो. परमेश्वराचे स्तवन करा (स्तोत्र १५०).

४. **वाद्याच्या साथीने गायची गीते देवाच्या लोकांसाठी उदाहरणादाखल स्तोत्रसंहितेच्या पुस्तकात लिहून ठेवली आहेत. आज ख्रिस्ताची वचने व्यक्त करणारी नवीन गीते हवी आहेत (रोम. १५:९; स्तोत्र १८:४९).**

दुसऱ्या शब्दात सांगायचे तर जेव्हा ख्रिस्त त्याच्या वचनाने अंत:करणाचा ताबा घेतो तेव्हा नवीन गीत लिहिले व गाईले जायला हवे. कोणीतरी म्हटले आहे, *"अशा गीतांचा तरुण प्लिनीच्या प्रसिद्ध पत्रांमध्येही उल्लेख आहे. ती लिहिते (पत्र १०,९६,७) ख्रिस्ती लोक "ख्रिस्ताला देव म्हणून गीत गाण्यासाठी जमत व परस्परांना प्रतिसाद देत गीते गात."*

DNTT, Vol. lll, p. 672

ब. देवाचे आणि ख्रिस्ताचे विशेष गुणवर्णन व कृत्ये अत्युच्च स्तुती करीत आनंदाने गाण्यात सादर केलेली गीते असतात. "भक्तिगीते" (Hymns)

१. भक्तिगीतात एखाद्याचे खास गुणविशेष व कार्ये पाठ म्हणून किंवा बोलून उत्सव करण्यासाठी गीते गाण्यावर भर दिलेला असतो.

ग्रीक जगतात हा सर्व परिचित शब्द वापरात होता. दैवतांचा गजर करीत स्तुती गाण्यासाठी तो वापरला जात असे. त्यात संगीत शैलीवर नव्हे तर गीतातील आशयावर लक्ष केंद्रित केलेले असे. उदा. पलिष्ट्यांनी त्यांचे दैवत दागोन याच्यासमोर अशा प्रकारे स्तुतिगीते गायली होती (शास्ते १६:२३-२४).

नंतर पलिष्ट्यांचे सर्व सरदार आपल्या दागोन नामक दैवताच्या प्रीत्यर्थ महायज्ञ व उत्सव करावयास जमा झाले; ते म्हणाले, आमच्या देवाने आमचा शत्रू शमशोन यास आमच्या हाती दिले आहे. लोकांनी त्यास पाहून आपल्या देवाची स्तुती करून म्हटले, आमच्या देवाने आमच्या देशाचा विध्वंस करणाऱ्या आणि आमच्या लोकांतल्या बहुत लोकांचा संहार करणाऱ्या शत्रूस आमच्या हाती दिले आहे (शास्ते १६:२३,२४).

२. वचनातील भक्तिगीतांची उदाहरणे.

अ. देवाचे गुण व महत्कृत्यांसाठी उत्सव करताना गाईलेली गीते.

अहो सर्व पृथ्वीवरील लोकहो, देवाचा जयजयकार करा. त्याच्या नामाचा महिमा गा, त्याच्या स्तुत्यर्थ त्याचे गौरव करा. देवाला म्हणा तुझी कृत्ये किती भयप्रद आहेत तुझ्या महाबलेकरून तुझे वैरी तुला वश होतात. सर्व पृथ्वीवरील लोक तुला नमतील व तुझी स्तोत्रे गातील, तुझ्या नामाची स्तोत्रे गातील (स्तोत्र ६६:१-४).

मग हिज्किया राजा व सरदार यांनी लेव्यांस आज्ञा केली की दावीद व आसाफ द्रष्टा यांची कवने गाऊन परमेश्वराची स्तुती करा. तेव्हा त्यांनी आनंदाने स्तुती केली व आपली मस्तके लववून आराधना केली (२ इतिहास २९:३०).

आणि लेव्यातले मुख्य हशब्या, शेरेब्या व कदमीएलाचा पुत्र येशुवा व त्यांच्यासमोर त्यांचे भाऊबंद असे मेळ्याने देवाचा मनुष्य दावीद याच्या आज्ञेप्रमाणे स्तवन व ईशोपकारस्मरण करावयास होते (नहेम्या १२:२४).

ब. ख्रिस्ताने आपल्या मरणाद्वारे देवाच्या तारणाची स्तुती करण्यासाठी पित्याला गीत गाईले.
मी आपल्या बांधवांजवळ तुझ्या नामाची कीर्ती वर्णीन, लोकसभेत तुझे स्तवन करीन (इब्री २:१२; स्तोत्र २२:२२).

क. पौल आणि सीला यांनी तुरुंगात, तसेच योवाशाच्या राज्याभिषेकासमयी सण साजरा करावा तशी गीते गाईली.
सुमारे मध्यरात्री पौल व सीला हे देवाला प्रार्थना करीत व गाणे गात असता बंदिवान त्यांचे ऐकत होते (प्रे. कृ. १६:२५).

आणि पाहाते तो राजा प्रवेशस्थानी आपल्या नेहमीच्या स्तंभापाशी उभा आहे, सेनानायक व करणे वाजवणारे राजाजवळ आहेत; देशचे सर्व लोक करणे वाजवून आनंद करीत आहेत; गाणारे व स्तवन शिकवणारे वाद्ये वाजवीत आहेत; हे अथल्येच्या दृष्टीस पडले (२ इतिहास २३:१३).

ड. इस्राएलांचा उद्धार झाल्याबद्दल त्यांनी आभार प्रदर्शन करीत देवाला गीत गाईले.
"तेव्हा तुम्ही तारणकूपातून उल्लासाने पाणी काढाल. त्या दिवशी तुम्ही म्हणाल, 'परमेश्वराचा धन्यवाद करा, त्याच्या नामाचा जयघोष करा, राष्ट्रांमध्ये त्याची कृत्ये विदित करा, त्याचे नाम थोर आहे अशी वाखाणणी करा.' परमेश्वरापुढे गायन करा कारण त्याची करणी प्रतापमय आहे; हे सर्व पृथ्वीवर विदित होवो.. अगे सियोन निवासीनी जयघोष कर, गजर कर का की इस्राएलाचा पवित्र प्रभू तुझ्या ठायी थोर आहे" (यशया १२:३-६).

इ. कोश परत मिळाल्यावर गीत गाऊन उत्सव केला.
परमेश्वराचे उपकारस्मरण करा, त्याचे नाम घ्या; राष्ट्रांस त्याची कृत्ये जाहीर करा. त्याला स्तोत्रे गा; त्याच्या सर्व अद्भुत कृत्यांचे वर्णन करा. त्याच्या पवित्र नामाचा अभिमान बाळगा; ज्यांना परमेश्वराचा ध्यास लागला आहे त्यांचे ऱ्हदय हर्षित होवो (१ इतिहास १६:८-१०).

या संदर्भांवरून स्पष्ट होते की ही गीते देवाची महत्कृत्ये व गुणवर्णन करण्यासाठी गाईली होती.

क. “काव्यगीते.” देवाने केलेला वैयक्तिक पुरवठा, दिलेले संरक्षण व सुटका याविषयींच्या अनुभवांबद्दल देवाची ओतप्रोत स्तुती करणारी गीते.

पुष्कळ स्तोत्रे शीर्षकांवरूनच ती काव्यगीते असल्याचे सूचित होते (स्तोत्रे १८-१३४ पर्यंत ३६ वेळा). स्तोत्रकर्त्याला आलेल्या देवाच्या गुणविशेषांच्या व महत्कृत्यांच्या वैयक्तिक अनुभवांवर ती स्तोत्रे प्रकाश टाकतात असे दर्शवले आहे.

१. पुरवठा व संरक्षणाविषयीची गीते.

तेथून ते कूच करून बैर (विहीर) येथे गेले; ज्या विहीरीविषयी परमेश्वराने मोशाला सांगितले होते की लोकांस एकत्र कर म्हणजे मी त्यांस पाणी देईन तीच ही विहीर. त्यासमयी इस्राएलांनी हे गीत गाईले: हे विहीरी उपळून ये, तुम्ही स्तुतिस्तोत्रे गा; सरदारांनी ही विहीर खणली, इस्राएलातील अमिरांनी आपल्या मोठ्यांनी व काठ्यांनी ही खणली. मग ते रानातून मत्तनास गेले (गणना २१:१६-८).

कोट बांधण्याचे काम संपल्यावर मी त्यास दरवाजे लावले आणि द्वारपाल, गायक आणि लेवी यांची नेमणूक केली (नहेम्या ७:१).

२. सुटकेची गीते.

तेव्हा मोशे आणि इस्राएल लोक यांनी परमेश्वराला हे गीत गाईले; ते म्हणाले, ‘‘मी परमेश्वराला गीत गाईन कारण तो विजयाने उन्नत झाला आहे; घोडा व राऊत त्याने समुद्रात उलथून टाकला आहे. परमेश्वर माझे बल माझा स्तोत्रविषय आहे, तो माझा उद्धारक झाला आहे; माझा देव हाच, याचे मी स्तोत्र गाईन; हाच माझ्या पित्याचा देव, मी त्याचा महिमा गाईन. परमेश्वर रणवीर आहे; याव्हे हे त्याचे नाम. फारोचे रथ व त्याची सेना ही त्याने समुद्रात उलथून टाकली आहेत; त्याचे निवडक सरदार तांबड्या समुद्रात बुडाले आहेत (निर्गम १५:१-४).

(२ शमुवेल ६:५ पाहा – दावीद कोशासमोर गाऊन नृत्य करतो)

टीप: काव्यगीतांमध्ये प्रथम पुरुषी सर्वनाम "मी", "आम्ही" वापरलेले असते हे लक्षात घ्या. बायबलचे लेखक जर त्यांच्या वतीने देवाचे व्यक्तित्व आणि कृत्यांचे वर्णन देवाची अत्युच्च स्तुती करण्यासाठी करत असतील तर असा वैयक्तिक संदर्भ ते मनुष्य केंद्रित मानत नसत.

III. तिसरी गोष्ट, देवाची स्तुती गीते गाण्यासाठी आपला विवेकभाव आपल्याला दिशा देत असतो. आपल्या अंत:करणात - कृपेच्या प्रेरणेने गा (१६ब).

अ. देव कोण आहे व त्याने काय केले ही जाणीव होऊन व त्याला वंदन करण्यासाठी गीत गाईले जाते.

प्रकटीकरण ५:९-१४ मधील गीतात, विवेकभावाने दिशा दिलेले देवाच्या मुक्तीच्या कृपेबद्दल स्तुतिगीत गाईले आहे. ते गातात, "तू ... योग्य आहेस कारण तू वधला गेला होतास." जो ख्रिस्त त्यांच्यामध्ये होता त्याने दिलेल्या मुक्तिसाठी त्याचे गुणगौरव करण्याकरता ते आपल्या स्तुतीला दिशा देत होते.

ब. आपल्या स्तुतिगानामध्ये व त्याद्वारे देवाचे सान्निध्य व आपल्या जवळ येणे अपेक्षित आहे.

सीयोनकन्ये उच्च स्वराने गा; हे इस्राएला, जयजयकार कर; यरुशलेमकन्ये उल्लास व उत्सव कर. परमेश्वराने तुझा दंड दूर केला आहे, तुझ्या शत्रुंचे निवारण केले आहे; इस्राएलाचा राजा परमेश्वर तुझ्यामध्ये आहे; तुला पुन्हा अरिष्टांची भीती प्राप्त होणार नाही. त्या दिवशी यरुशलेमास म्हणतील, हे सीयोना, भिऊ नको, तुझे हात गळू देऊ नको. परमेश्वर तुझा देव, सहाय्य करणाऱ्या वीरासारखा तुझ्याठायी आहे, तो तुझ्याविषयी आनंदोत्सव करील; त्याचे प्रेम स्थिर राहील, तुझ्याविषयी त्याला उल्लास वाटून तो गाईल (सफन्या ३:१४-१७).

सफन्या सुचवतो की जेव्हा देवाचे लोक देवाला स्तुतीची गीते गातात, तेव्हा देव स्वत: त्यांच्यामध्ये उपस्थित राहून त्यांच्या समवेत गातो! स्तोत्र २२:३ मध्येही आपण पाहातो. तेथे म्हटले आहे, *"हे इस्राएलाच्या स्तवनात वसणाऱ्या, तू पवित्र आहेस"* (स्तोत्र २२:३).

ख्रिस्ताला इम्मानुएल म्हणजे "आम्हाबरोबर देव" असे म्हटले आहे. ख्रिस्ताचे गौरव करताना, स्तुतीची गीते गाताना विशेष अर्थाने त्याची उपस्थिती आपल्यामध्ये असते.

क. स्तुतिगान करताना आपण परस्परांना उद्देशून गाणी म्हणायची आहेत.

परस्परांना उद्देशून गाताना आपण देवाला गात असतो. समूहगान मुळीच वाद्यसंगीतात बुडून जाता कामा नये. वाद्यवादकांवर लक्ष केंद्रित नसावे, ते काही करमणूक करणारे कलाकार नसतात. त्यांना प्रमुख स्थान नसावे ... देवाला केलेल्या समूहगानाला असावे. संगीतकार स्तुती करण्यात साथ देऊन मदत करतात.

ड. देवाला आनंदाने दिलेला आदर, माणसाला नव्हे तर देवाला संतोषवण्याचे ध्येय ठेवतो.

१. देव आपल्या बरोबरीचा मित्र असल्याप्रमाणे अतिसलगी असल्यासारखी, हेतूहीन व अवखळपणे गीते होणार नाहीत याचे भान ठेऊन त्याला आदर व्यक्त केला पाहिजे (इब्री १२:२८; १३:१५).

यास्तव न हलणारे राज्य मिळणारे जे आपण ते उपकार मानू; तेणेकरून देवाला प्रिय होईल अशी त्याची सेवा सद्भक्तीने व सद्भयाने करू (इब्री १२:१८).

यावरून आपण त्याच्याच द्वारे देवाला उपकारस्मरणरूपी यज्ञ नरंतर अर्पावा, हा यज्ञ त्याचे नाम स्वीकारणाऱ्या 'ओठांचे फळ' असा आहे (इब्री १३:१५).

विशेषत: देवाची स्तुती आपण देवासाठी जगताना करायला हवी. जेव्हा जेव्हा देवाच्या लोकांचा समुदाय एकत्र येईल तेव्हा तेव्हा पवित्र आनंदाचे उधाण यायला हवे. काही लोकांना आनंद करण्यात एवढे भय वाटत असते की एखादा अशा भ्रमाखाली राहतो की जे कोणी भक्तिमान असतील त्यांनी खिन्नच असावे लागत असावे. जर आपण बाल दैवताचे उपासक असू तर स्वत:वर चाकूने घाय करून घेणार हे नक्की; जगन्नाथ किंवा कालीचे भक्त असू तर स्वत:ला यातना करून घेणे हे मान्य करू; जर पोपचा आदर करणारे असू तर केसाळ सदरा घालून चाबकाचे कोरडे ओढून घेऊ; पण सतत धन्यवादित असणाऱ्या जो देव आपल्या निर्मितीला आनंदित ठेवण्यात संतोष मानतो, त्याच्या उपासनेत पवित्र आनंद हा उपासनेचा एक भागच असतो. आणि प्रभूचा आनंद ही तर पवित्र आत्म्याच्या द्वारे प्राप्त झालेल्या अनेक कृपांपैकी एक आहे. बंधुजनहो, जेव्हा आपण प्रभूची स्तुती करतो तेव्हा हर्षित होऊ या. जेव्हा मी पाहातो की काही लोक त्यांच्या भक्तिगीतांमधून आनंदाचे शब्द काढून टाकतात तेव्हा मला अतिशय यातना होतात. १००व्या स्तोत्राचे शब्द असे आहेत:
"अहो, पृथ्वीवरील सर्व लोकहो, आनंदी वाणीने प्रभुला गीत गा ... त्याची सेवा करा."

काय? त्यांनी त्याची सेवा भयभीत होऊन करा असे त्याचे आधुनिकीकरण केले आहे? पण जुन्या भाषांतरात म्हटले आहे ... हर्षाने परमेश्वराची सेवा करा; गायन करीत त्याच्यापुढे या.'

काही भाषांतरकारांनी 'हर्षाने' हा शब्द का काढून टाकला नाही, आणि 'खिन्नपणे प्रभूला गीत गा' असे शब्द का बरे घातले नाहीत असा प्रश्न मला पडतो!

अशा प्रकारच्या 'सुधारणा' स्तोत्रांमध्ये केल्या असत्या तर एका दाण्याइतकीही आराधना त्यात राहिली नसती. मला मनापासून त्याला गायचे आहे. 'हर्षाने गीत गाऊन सेवा करायची.' आनंदाने हर्षित हृदयाने मी माझ्या देवाची स्तुती करीन. जर तुम्ही त्याचे मूल आहात, तर तुमच्या पित्याच्या सान्निध्यात आनंद करा. जर तुम्हाला क्षमा प्राप्त झाली आहे, तर तुमच्यावर दया होऊन तुमची पापे धुतली गेली म्हणून आनंद करा; संकटांनी तुम्ही कसोटीतून जात असाल, तरीही सर्व काही तुमच्या कल्याणार्थ होत आहे, या जाणीवेने तुमच्या विपत्तीतही आनंद करा. प्रभुमध्ये सर्वदा आनंद करा; पुन्हाही सांगतो आनंद करा.

— C. H. Spurgeon, *The Metropolitan Tabernacle Pulpit: Vol. XVI,* p. 70

२ देवाच्या आदरासाठी विपुल उत्साहपूर्ण, ज्वलंत हर्ष सुसंगत आहे.

स्तोत्र २:११ मध्ये विपुल उत्साहाचा आनंद व आदर या दोहोंची सांगड घातली आहे. त्यात म्हटले आहे, "*भीड धरून परमेश्वराची सेवा करा; कंपित होऊन हर्ष करा.*" संपूर्ण देवाच्या

वचनात विपुल उत्साहाचा आनंद व आदर यातील सुसंगती आढळून येते. आनंदहीन आदर हा खरा आदरच नव्हे. हे कसे शक्य आहे? असल्या आदराने शुभवर्तमानाद्वारे ख्रिस्ताबरोबर जो आनंद येतो, तो वजा किंवा कमी केला जातो. उदा. पौल फिलिपैकरांना म्हणतो,

बंधुजनहो आता इतकेच सांगणे आहे की प्रभूमध्ये आनंद करा. अशा गोष्टी तुम्हांस लिहिण्याचा मी कंटाळा करत नाही, आणि त्या तुम्हांस दृढ करणाऱ्या आहेत...जे आपण देवाच्या आत्म्याने सेवा करणारे, ख्रिस्त येशूविषयी अभिमान बाळगणारे व देहावर भरवसा न ठेवणारे, ते आपण सुंता झालेलेच आहोत (फिलिपै ३:१,३).

स्तुतीची गीते आनंद व्यक्त करताना ती बहुधा जोमाने वाद्यांच्या व टाळयांच्या साथीने मोठा गजर करीत गाईली जातात.

परमेश्वराचे स्तवन करा! देवाचे त्याच्या पवित्रस्थानी स्तवन करा; त्याच्या सामर्थ्याच्या नभोमंडळात त्याचे स्तवन करा. त्याच्या पराक्रमाच्या कृत्यास्तव त्याचे स्तवन करा; त्याच्या थोरवीच्या वैपुल्यानुसार त्याचे स्तवन करा. करणा वाजवून त्याचे स्तवन करा. सतार व वीणा वाजवून त्याचे स्तवन करा. डफ वाजवून व नृत्य करून त्याचे स्तवन करा. तंतुवाद्ये व बासरी वाजवून त्याचे स्तवन करा. खणखणणारे टाळ वाजवून त्याचे स्तवन करा. झणझणणाऱ्या झांजा वाजवून त्याचे स्तवन करा. प्रत्येक श्वासवान प्राणी परमेशाचे स्तवन करो. परमेश्वराचे स्तवन करा (स्तोत्र १५०).

हे देवा, तू माझा देव आहेस; मी आस्थेने तुझा शोध करीन; शुष्क रुक्ष व निर्जल प्रदेशात माझा जीव तुझ्यासाठी तान्हेला होतो, माझ्या देहालाही तुझी उत्कंठा लागली आहे. अशा प्रकारे तुझे बळ व वैभव पाहाण्यास पवित्र स्थानी मी तुझ्याकडे दृष्टी लावली आहे. तुझे वात्सल्य जीवनाहून उत्तम आहे, माझे ओठ तुझे स्तवन करतील. मी जिवंत आहे तोपर्यंत तुझा धन्यवाद असाच करीन; तुझ्या नामाने मी आपले हात उभारीन (स्तोत्र ६३:१-४).

अहो सर्व लोकहो, टाळ्या वाजवा; उत्साहशब्दांनी देवाचा जयजयकार करा ... जयघोष होत असता देव वर गेला आहे, करण्याचा शब्द होत असता परमेश्वर वर गेला आहे. देवाची स्तुतिस्तोत्रे गा, स्तुतिस्तोत्रे गा; आमच्या राजाची स्तुतिस्तोत्रे गा, स्तुतिस्तोत्रे गा (स्तोत्र ४७:१,५,६).

३. यासाठी आपली मने व अंत:करणे देवावर केंद्रित होणे गरजेचे आहे, आपल्या भोवताली कोण अगर काय आहे यावर नव्हे.

IV. **चौथी गोष्ट, भावनांनी हेलावून गेलेल्या अंत:करणातून व कृपेने प्रकाशित झालेल्या डोक्यातून स्तुतीची गीते उफाळून येतात. आपल्या अंत:करणात देवाला गा (१६अ).**

V. **पाचवी गोष्ट, ख्रिस्तामध्ये आपल्याला जे काही प्राप्त झाले आहे त्याला गौरव देण्यासाठी पित्याला कृतज्ञता व्यक्त करणे हे स्तुतिगीतांचे गुणवैशिष्ट्य असते. आणि बोलणे किंवा करणे जे काही तुम्ही करता, ते सर्व प्रभू येशूच्या नावाने करा; आणि त्याच्याद्वारे देव जो पिता त्याचे उपकारस्मरण करा" (१७).**

अ. **देवाच्या नामाला म्हणजेच त्याच्या व्यक्तित्त्वाचे गौरव व कार्य याला स्तुती हा प्रतिसाद असतो (यशया ४८:१०, ११).**

नाम व गौरव ही समानार्थी व आपसात अदलाबदल करणारे शब्द आहेत हे यशया ४८:१०, ११ मध्ये आढळते.

मी तुला गाळले आहे, पण रुप्याप्रमाणे नव्हे; मी दु:खरूप भट्टीत तुला कसोटीस लावले आहे. माझ्या, केवळ माझ्याच प्रीत्यर्थ हे मी करतो; माझ्या नामाची अप्रतिष्ठा का व्हावी! माझे गौरव मी इतरांस देत नाही (यशया ४८:१०, ११).

ब. **आपण जे असहाय पापी त्या आपल्याला ज्याची गरज आहे ते सर्व देण्यासाठी पित्याने आपल्या पुत्राला देऊन टाकले, त्याकरता हा वैयक्तिक प्रतिसाद असतो.**

१. **मर्यादा नसलेला हा पुत्र मानव झाला आणि आपल्या शरीराने दु:खसहन करून त्याने देवाशी आपला समेट घडवून आणला (१:१५-१७, २२).**

२. **त्याने बदलीच्या मरणाने आपल्याला पूर्ण क्षमा उपलब्ध करून दिली (२:१३).**

३. **त्याने आपल्याला जिवंत करून आपली पुनर्निर्मिती केली त्यामुळे आपल्याला पूर्णपणे नवीन ओळख व अस्तित्व ही प्राप्त झाली (२:१३; ३:१०).**

४. **ज्ञान व सामर्थ्यासाठी तो आपल्याला लागेल तो सर्व पुरवठा करतो (कलसै १:९; २:२-३; ३:११).**

क. **आभारप्रदर्शनाचा हा भागच आपल्या संपूर्ण जीवनाचे गुणवैशिष्ट्य आहे.**

ILL: फर्डिनंड व ईजबेला, "स्पेनच्या राजाच्या नामाप्रीत्यर्थ स्पॅनिश विजेता छोट्या अगर मोठ्या नवीन भूमीवर दावा करील."

आत्म्याने देवाची उपासना करणे – फिलिपै ३:१-३

प्रस्तावना

अ. **ख्रिस्त स्वत:हून नम्र होऊन मृत्यू पावला याभोवती केंद्रित असलेल्या कृपेच्या सुवार्तेचे महान सत्य पौल पुन्हा सांगत आहे (२:५-९).**

ख्रिस्त हा सार्वकालिक असल्याने तो देवपित्यासमान असल्याचे पौल प्रथम घोषित करतो. दुसरी गोष्ट तो वधस्तंभावरचे मरण मरण्यासाठी तो ख्रिस्त मानवी स्वरूपात खाली उतरला असे तो घोषित करतो (२:५-८). पौल स्पष्ट करतो की ख्रिस्ताने स्वत:ला नम्र करण्यासाठी आणि मरण्यासाठी जे काही केले ते सर्व दुसऱ्यांसाठीच केले (२:४). त्याचे आज्ञापालन, वधस्तंभावरील मरण, मरेपर्यंत केलेले आज्ञापालन दुसऱ्यांसाठी होते. ते प्रायश्चित्तासाठी बदलीचे मरण होते, खास करून ज्यांच्या ठायी स्वत:चे नीतिमत्त्व नव्हते, त्यांना नीतिमान ठरवण्याची तरतूद त्यात त्याने केली होती (रोम. ५:१८,१९). पहिल्या वचनामध्ये उल्लेखलेल्या विश्वासीयांच्या आनंदाचे ते एक महान कारण होते.

ब. **पौल यासाठी आनंद करतो की देवाच्या लोकांसाठी दु: ख सोसण्याची त्याला सुसंधी मिळाली आहे त्यामुळे ख्रिस्तामध्ये देवाने त्यांच्यासाठी जे सर्व काही केले त्याचा ते अनुभव घेत होते. तो आपल्यालाही स्मरण करून देतो की आपणही आनंद केला पाहिजे (२:१८-१९).**

क. **आता अध्याय ३:१ मध्ये पौल आपल्याला आज्ञा देऊन आठवण करून देतो की आपण प्रभूमध्ये आणि कृपेच्या सुवार्तेमध्ये आणि साधेपणाने आपल्या देवाची उपासना करून आनंद करावा.**

विश्वासी व्यक्तीने देवाची उपासना करण्याबाबत पौल तीन गोष्टी सांगतो.

I. **कृपेच्या सुवार्तेला प्रतिसाद देणारे आनंदित व हर्षित अंत:करण हा उपासनेचा गाभा आहे. शेवटी, माझ्या बंधूंनो, प्रभूमध्ये आनंद करा. अशा गोष्टी तुम्हाला लिहिण्यास मी कंटाळा करत नाही, पण ते तुमच्यासाठी सुरक्षितपणाचे आहे (फिलिपै ३:१).**

अ. **हा वरकरणी उत्साह नसून खराखुरा आनंद आहे.**

ब. **शुभवर्तमानात येशूने आपल्यासाठी जे काही केले त्यापासून व ख्रिस्तापासून प्राप्त होणारा खरा आनंद व उल्लास आहे.**

ख्रिस्ताविषयी आपण अभिमान बाळगतो म्हणून आपल्याला आनंद आहे (व.३). आपण केवळ त्याच्याच नीतिमत्वाने नीतिमान ठरून स्वीकारले गेलो आहोत (व.९).

क. आनंद करा ह्या आज्ञेची तो पुनरावृत्ती करतो.

आनंद करण्याची आज्ञा दिली आहे याचा अर्थ ख्रिस्त तो आनंद आपल्याला देतो. आपण ख्रिस्तामध्ये आनंद करू शकतो. पौलाला ख्रिस्ताची घोषणा करण्याने आनंद प्राप्त होतो (१:१२-१८). ख्रिस्ताच्या गौरवासाठी आपले जीवन ओतले जाण्यात त्याला आनंद आहे (२:१८,२७). आपणही आनंदाचा अनुभव घेऊ शकतो. ख्रिस्त स्वत: आपल्या लोकांना आनंद देतो (योहान १५:११).

ड. आपल्या आनंदाचे कारण तर ख्रिस्त आहे. तोच आपल्याला आनंद देतो! त्याची कृपा आपल्या आनंदाचे मूळ आहे (३:३).

II. दुष्टता आपला आनंद चोरून घेऊन उपासनेला अडखळण करते. त्या कुत्र्यांविषयी सावध असा; त्या दुष्कर्म्यांविषयी सावघ असा; केवळ सुंता झालेल्या लोकांविषयी सावध असा (३:२).

अ. आपल्या उपासनेच्या आनंदावर खोट्या शिक्षकांविषयीची गंभीर दहशत आहे यावर तो जोर देतो. तीन वेळा तो म्हणतो, सावध राहा!

ब. त्यांच्याकडे कुत्रे किंवा बाहेरचे लोक म्हणून पाहिले जाते. ते कर्मांनी शुभवर्तमान भ्रष्ट करतात.

जे सुंता करणे आवश्यक असल्याचे शिकवतात त्यांना कुत्रे म्हणणे योग्य आहे. जे सत्कर्मे करायला शिकवतात ते बाहेरचे आहेत. त्यांना शुभवर्तमानातील कृपा समजत नाही.

क. सत्कर्मांची भर घालून ते शुभवर्तमान उलथून पाडतात.

नियमशास्त्रातील सुंता व कर्मे यांची भर घालून ते शुभवर्तमान तोडून मोडून छिन्नविछिन्न करतात. सर्वात वाईट म्हणजे त्यामुळे आपल्याला देवाने स्वीकारले आहे ह्याची खात्री व त्यामुळे त्यांना जो आनंद प्राप्त झाला तो ते चोरतात (रोम. १०:३-४; गलती ३:१०). याचा उलट परिणाम होऊन हर्षित अंत:करणाने खऱ्या आनंदाने उपासना करण्यात अडथळा येतो.

III. उपासनेचे गुणलक्षण म्हणजे संपूर्ण जीवनातून ती व्यक्त होते.कारण जे आपण देवाच्या आत्म्याने सेवा करणारे, ख्रिस्त येशुविषयी अभिमान बाळगणारे व देहावर भरवसा न ठेवणारे, ते आपण सुंता झालेलेच आहो (३).

अ. आपण नवीकरण झालेले लोक आहोत (ही खरी सुंता). आपण आता उपासनेच्या अंत:करणाने देवाचे व्यक्तित्व आणि कार्य पाहून त्याचा आनंदाने उपभोग घेऊ शकतो. कारण आपण सुंता झालेलेच आहो (व. ३).

१. 'आपण' वर जोर दिलेला आहे. सर्व खऱ्या विश्वासी जनांची अंत:करणाची सुंता झाली आहे.

२. जे सर्व देवाची उपासना करतात त्यांची ख्रिस्ताचे गौरव करणे ही जीवनशैलीच झालेली असते. नीतिमान ठरले गेल्यामुळे ते ख्रिस्तामध्ये अभिमान बाळगतात (९).

३. 'खरी सुंता' याद्वारे मोठ्या प्रमाणात झालेले नवीकरण सूचित होते.

पापाने दूषित झालेला स्वभाव छाटून टाकण्या संदर्भात "खरी सुंता " हा शब्द प्रयोग वापरला आहे. व आपल्या स्वभावात नीतिमत्ता रुजवण्याची भर घातल्याने आपण पूर्णपणे नवीन निर्मिती झालो आहोत (इफिस ४:२४; कलसै २:१२; ३:१०)

**ब. उपासनेच्या सेवेने आपण प्रतिसाद देत असतो. ही आपल्या संपूर्ण अस्तित्वाचीच खूण
` असते. आत्म्याने सेवा करणारे (व.३)**

'उपासना' (lutreuo) या संकल्पनेसाठी असलेला शब्द जुन्या करारातून आला आहे. तो तेथे असे सूचित करतो की उपासना ही संपूर्ण जीवनाने करायची सेवा आहे.

ग्रीक साहित्यात Latreuein या शब्दाचा क्वचितच वापर केला जात असे. त्यानंतर जुन्या कराराचे Septuagint नावाचे ग्रीक भाषांतर झाले तेव्हा भाषांतरकारांनी या शब्दाला खास श्रेष्ठत्व दिले. केवळ देवाला किंवा विदेशी दैवतांना उपासना सादर करण्यासंदर्भात त्या शब्दाचा वापर केला. खास करून यज्ञांनी किंवा विधिसंस्कारांनी सेवा करताना त्याचा वापर केला. नव्या कराराच्या काळापर्यंत हा शब्दप्रयोग धार्मिक किंवा धर्ममतप्रणालींसंदर्भात प्रामुख्याने वापरला जाऊ लागला.

— Peterson, *Engaging with God,* p. 64

१. यात सेवा करणे (निर्गम ३:१२; ४:२३; ८:१; ९:१), आणि यज्ञयागांचा समावेश होतो (निर्गम ५:३,८; ८:१८).

२. आपल्याला सर्व आशीर्वाद देवाकडून प्राप्त झाले असल्याने देवाचे भय धरून त्याच्यावरील प्रीतीतून उपासना प्रेरित झाली होती (अनुवाद ६:१२; १०:२०).

ज्या परमेश्वराने तुला मिसर देशातून, दास्यगृहातून, बाहेर काढले त्याचा तुला विसर पडू नये म्हणून जप. तू आपला देव परमेश्वर याचे भय बाळग, त्याची सेवा कर आणि त्याच्याच नावाने शपथ वाहा (अनुवाद ६:१२-१३).

आपला देव परमेश्वर ह्याचे भय बाळग, त्याची सेवा कर, त्याला धरून राहा आणि त्याच्याच नावाने शपथ वाहा (अनुवाद १०:२०).

३. त्यात आयुष्यभर निष्ठा ठेवणे समाविष्ट होते (अनुवाद ६:१३,१४; यहोशवा २२:५, २४:१४-२४).

तू आपला देव परमेश्वर याचे भय बाळग, त्याची सेवा कर आणि त्याच्याच नावाने शपथ वाहा. तुम्ही अन्य देवांच्या म्हणजे सभोवतालच्या राष्ट्रांच्या देवांच्या मागे लागू नका (अनुवाद ६:१३-१४).

जेव्हा रविवारी आपण सामूहिक भेटीसाठी जमतो, तेव्हा आठवडाभर आपण जे काही केले तेच पुढे चालू ठेवत असतो. पण तेव्हा एक वेगळेच चैतन्य असते कारण आपण समूहाने एकत्र येऊन ते करणार असतो. वचनावर उपदेश चालू असता आपण एकत्र उपासना करत असतो आणि एकत्र अंत:करणपूर्वक गीते गात असतो.

क. उपासनेला प्रतिसाद द्यायला पवित्र आत्मा आपल्याला भाग पाडत असतो. आराधना करणे व ख्रिस्ताला उंचावणे ही त्याची सर्वोच्च तीव्र भावना असते (१:१९; योहान १६:१४-१५). जे आम्ही देवाच्या आत्म्याने आराधना करणारे (फिलिपै ३:३).

ड. उपासनेला असलेला आपला प्रतिसाद ख्रिस्तामध्ये सिद्धिस गेलेल्या मुक्तिच्या ज्ञानाने व अनुभवाने हृदयाची पकड घेतल्याचा परिणाम असतो. ख्रिस्त येशूत आनंद करणारे (३:३).

इ. देवाने आपला स्वीकार करावा अशी नीतिमत्ता आपल्या ठायी नाही तरी आपल्याला नीतिमान ठरवण्यासाठी ख्रिस्त आपली नीतिमत्ता झाला या वास्तवतेमुळे आराधना हाच प्रतिसाद देणे आपल्याला भाग पडते. देहावर भरवसा ठेवणारे नाही (३:३).

पौल "देहावर भरवसा न ठेवणाऱ्यांपैकी"एकआहे हे या विधानात वचन९मधली प्रतीक्षा आहे. ३:९ मध्ये तो म्हणतो, "आणि मी त्याच्याठायी आढळावे आणि माझे नीतिमत्व - माझे स्वत:चे नव्हे म्हणजे नियमशास्त्राच्या द्वारे प्राप्त होणारे नीतिमत्व नव्हे - तर ते ख्रिस्तावरील विश्वासाने प्राप्त होणारे म्हणजे देवापासून प्राप्त होणारे नीतिमत्व असे असावे." पौल चौथ्या वचनात सुरुवातीला जे वास्तव मांडतो त्यावरून स्पष्ट होते की जर कोणी कर्मांनी नीतिमान ठरल्याचे समर्थन करू शकत असेल तर तो मी आहे असे तो म्हणतो. तरीही देवासमोर नीतिमान म्हणून उभे राहाण्यास ते सर्व कुचकामी असल्यामुळे तो त्या सर्व गोष्टींचा केरकचरा समजून धिक्कार करतो (७,८). मग तो आपल्या नीतिमत्तेचे समर्थन करताना कोणावर भरवसा ठेवतो याविषयी वचन ९ मध्ये कळसाचे विधान करतो. पण तिसऱ्या वचनातील आपल्या नीतिमत्वासाठी ख्रिस्ताविषयीचा अभिमान हा मुद्दा मुळात आपल्या खऱ्या उपासनेचे इंधन आहे. विश्वासीयाची उपासना त्याच्या मोफत व अंतिम नीतिमान ठरले जाण्यातून प्रवाहित होते. हेच जर तुम्ही वजा केले तर तुम्ही आनंदाचे मूळच काढून टाकता (व.१) आणि उल्हासित अंत:करणाच्या खऱ्या अस्सल उपासनेची नसच कापून टाकता. याच कारणास्तव पौलाचा वचन २ आणि ३ मध्ये संतापाचा उद्रेक झालेला दिसतो.